४ ऑक्टोबर १९६९ चाळीस पैसे

# माणूस

हे खुदाई खिदमतगार येत आहेत, स्वतंत्र पख्तुनिस्तानच्या मागणीला भारताचा पाठिंबा मिळविण्यासाठी....

आपण त्यांना देणार आहोत फक्त पारितोषिके आणि निधी....



# माणूस

समग्र साप्ताहिक

वर्ष नववे : अंक अठरावा

संपादक : श्री. ग. माजगावकर

सहाय्यक : दिलीप माजगावकर, सौ. निर्मला पुरंदरे

१०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी ५७३५९

किंमत ४० पैसे : वार्षिक वर्गणी वीस रुपये : परदेशची वर्गणी चाळीस रुपये


‘ग्यानबा’, भिंतीच्या तुंबड्या इ. लोकप्रिय सदरां-बरोबर साप्ताहिक भविष्यही बंद झाल्याचे दिसते. माझ्याचप्रमाणे सर्वचजण ती सदरे पुन्हा चालू धरण्याचा आग्रह धरतील अशी खात्री आहे. नवीन हवेच पण त्याबरोबर जुन्यांना कात्री नको ! कृपया याचा विचार व्हावा !

२२ सप्टेंबर एस्. व्ही. चाटी, औरंगाबाद.

दि. २७ चा अंक मिळाला. सुरुवातीस भविष्या-संबंधीचे एक पत्र आहे. माझ्यामते भविष्य नसावे, त्याचा उपयोग तरी काय ? असो. अलीकडे बाबासाहेब पुरंदरे यांच्या गोष्टी येतात, त्या आवडतात. भविष्याऐवजी अशा कथाच असाव्यात, परंतु त्यांच्या गोष्टीसाठी टाइप वापरता तो मोठा का ? छोट्या टाइपामध्ये गोष्टी द्याव्यात, म्हणजे जी बचत होते ती इतर मजकुराने भरून निघेल. तसेच ‘ माणस ’ला विनोदाचे वावडे आहे काय ?

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी ‘ माणस ’ साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

पूर्वी 'ग्यानबा'चे खोचक बोचक लिखाण असायचे अलीकडे ८-१० अंकातून ग्यानबाही दिसेनात. कृपया ही उणीव त्वरीत भरून काढावी.

२५ सप्टेंबर अण्णाराव गोविंद डोईजोडे, सोलापूर

संपादक 'माणूस' यास, स. न. वि. वि. २६ सप्टेंबर


दि. २० सप्टेंबर १९६९ च्या 'माणूस'च्या अंकात आपण माझा 'बँकांचे राष्ट्रीयीकरण : एक अव्हान' या शीर्षकाचा लेख प्रसिद्ध केला आहे. त्यासंबंधात काही गोष्टी या पत्रात नमूद करीत आहे.

१. वरील लेख मी ऑगस्टअखेर लिहिला व आपल्याकडे पाठविला. विशिष्ट प्रदेशाच्या सर्वांगीण विकासाची जबाबदारी एकेका राष्ट्रीयीकृत बँकेकडे सोपविण्याची कल्पना मी त्या लेखात मांडली होती. रिझर्व्ह बँकेने ही कल्पना आता प्रत्यक्षात उतरविली आहे. सलग असे काही जिल्हे एकेका बँकेला दत्तक द्यायचे व त्या प्रदेशातील विकासाचे नेतृत्व त्या त्या बँकेकडे सोपविण्याची योजना आता निश्चित झाली आहे. आपल्याला दत्तक मिळालेल्या प्रदेशाची योग्य ती पाहाणी करणे, आकडेवारी जमविणे, त्या त्या प्रदेशाच्या समस्यांचा विचार करून पत-तारण धोरण ठरविणे ही कामे नेतृत्व करणारी बँक करील. विकासाबाबत योग्य ती स्पर्धाही या धोरणात अनुस्यूत आहे, त्यामुळे बँकांची कार्यक्षमता वाढू शकेल.

२. राष्ट्रीयीकृत बँकांच्या ठेवी गेल्या महिन्या–दीड महिन्यात वाढल्या आहेत, ही जनतेची राष्ट्रीयीकरणाच्या धोरणाला मिळालेल्या संमतीची पावती म्हणावी लागेल.

३. सरकारची अनेक आर्थिक धोरणे आजवर फसली आहेत. १९६६ सालच्या जूनच्या ७ तारखेला केलेले रुपयाचे अवमूल्यन हे त्यातील एक ठळक उदाहरण. आजवर असलेल्या धोरणात सरकारचा पैसा गेला–नुकसान झाले. ही गोष्ट खरी–पण बँकांचे राष्ट्रीयीकरण फसले तर देशात आर्थिक अराजक निर्माण होईल आणि वेळेनुसार या राष्ट्राचे स्वातंत्र्यही धोक्यात येईल. या दृष्टीने देशाचे आर्थिक धोरण अंमलात आणणारी एक निराळी यंत्रणा उभी करायला हवी. बँकक्षेत्राचे सरकारीकरण होऊ नये, लालफीत, लाचलुचपत, वशिलेबाजी, गुंड–पुंड आणि राजकीय वा समाजिक कार्यकर्ते यांनी बँकव्यवहारात ढवळाढवळ करू नये या दृष्टीने ही नियंत्रणयंत्रणा न्यायमंडळाप्रमाणे अगदी स्वतंत्र असायला हवी. कै. नेहरूंनी 'सुप्रा कॅबिनेट' म्हणता येईल असे नियोजन मंडळ निर्माण केले. आता पंतप्रधान 'सुप्रा प्लॅनिंग कमिशन' ठरू शकणारे सल्लागार मंडळ अर्थखात्यात निर्माण करू पाहात आहेत. पण त्याने वरील प्रश्न सुटणार नाहीत म्हणूनच आर्थिक बाबतीत संपूर्णतया स्वतंत्र असलेली 'सेंट्रल फिनानशिअल् अॅथॉरिटी' निर्माण व्हायला हवी. भारतीय घटनेत योग्य ते बदल करून रिझर्व्ह बँकेलाही हे अधिकार देता येण्यासारखे आहेत–असे मला वाटते.

बँकांचे राष्ट्रीयीकरण ही गोष्ट समाजातील विविध थरांना ढवळून काढणारी ठरली आहे. त्या दृष्टीने वरील सूचनांच्या आणि लेखात उपस्थित केलेल्या मुद्यांच्या सदर्भात अधिक मंडळींनी मतप्रदर्शन केल्यास विषय सर्वबाजूंनी स्पष्ट होण्याच्या दृष्टीने मदत होईल. रा. म. बिवलकर



# दिल्ली

## दिनांक २३ सप्टेंबर

### सिंडिकेटच्या शीतयुद्धाचा शिळोपा

सिंडिकेट-इंडिकेट शीतयुद्ध गेल्या आठवड्यात अधिकच थंड पडले आहे. या युद्धाची दुसरी ठिणगी ए. आय्. सी. सी. च्या आगामी अधिवेशनात पडणार हे उघड आहे, परंतु हे अधिवेशन पूर्वी वाटले होते त्याप्रमाणे पुढील महिन्यात होण्याचा रंग दिसत नाही. याचे मुख्य कारण म्हणजे इंदिरा गांधींशी पुन: दोन हात करण्याची सिंडिकेटची अजून तयारी झाली नाही. गेला पाऊण महिना दोन्ही गट एकमेकांवर आरोप-प्रत्यारोपांचा वर्षाव करीत आहेत आणि ए. आय्. सी. सी. च्या अधिवेशनात सोक्षमोक्ष करण्याची धमकी देत आहेत. पण गंमत अशी की हे अधिवेशन कधी एका गटाला हवेसे वाटते व दुसऱ्याला नकोसे वाटते, तर कधी दुसऱ्याला हवेसे वाटते व पहिल्याला नकोसे वाटते. सांप्रतची परिस्थिती अशी आहे की इंदिरानुचरांना ते पाहिजे आहे तर त्यांच्या विरोधकांना ते नको आहे. सिंडिकेट–संघाला आता अशी कुशंका येऊ लागली आहे की गेल्या काही दिवसात कांग्रेसमध्ये घडलेल्या घटनांचा काथ्याकूट करणारा मेळावा इतक्यातच भरला तर इंदिराजींचे आधीच जड होऊ पाहणारे पारडे थेट खाली जाईल–अन् मग आपली अवस्था काय होईल ?

इंदिराजींचा नाही तर निदान त्यांच्या गोटाचा तरी तेजोभंग करावा या उद्देशाने मोरारजी–प्रकरण पुन: उकरून काढण्यासाठी अधिवेशन बोलावण्याचा अप्पांनी काही दिवसांपूर्वी घाट घातला होता खरा, पण बाईंच्या ठाम नकारामुळे या बाबतीत त्यांना आता फारसा उत्साह राहिलेला दिसत नाही. कांग्रेस कार्यकारिणीची बैठक आता पुढच्या महिन्यात होईल, व त्यानंतर ए. आय्. सी. सी. सेशनसाठी किमान एक महिन्याची नोटीस पाहिजे. याचा अर्थ सेशन नोव्हेंबरच्या आधी होत नाही.

सध्या बहुतेक सर्व नेते मंडळींनी तेरीभी चुप मेरीभी चुप असे धोरण स्वीकारलेले दिसते. एकीकडे इंदिराजींनी गेल्या काही दिवसात एकाही सिंडिकेटी श्रेष्ठीवर टीकास्त्र सोडलेले नाही, तर दुसरीकडे आश्चर्य म्हणजे सदोबांनीही अशी समेटाची

सूचना केली आहे की सर्व नेत्यांनी एकत्र बसून मतभेद मिटवावेत व सांप्रतच्या कलहाला मूठमाती द्यावी. (म्हणजे सिंहाची शेळीच झाली की हो!) मोरारजी तर सध्या अहमदाबादेच्या वडवाग्नीत सापडले असल्याने त्यांनी सत्याग्रहाच्या धमकी-नंतर काही नवीन पत्रक काढलेले नाही. मात्र इंदिराजींवर रोखलेला आपला तृतीय नेत्र बंद करण्याची सध्या तरी त्यांची तयारी दिसत नाही. इंदिराजींना 'माफी' मागायला भाग पाडण्यासाठी त्यांच्या विरुद्ध सत्याग्रह करण्याची कल्पना त्यांनी सोडून द्यावी अशी काही काँग्रेस–श्रेष्ठी त्यांना गळ घालीत असल्याचे कळते; पण मोरारजींसारखा आग्रही माणूस आपल्याला सत्य वाटणाऱ्या गोष्टीचा आग्रह इतक्या सहजासहजी सोडणे कठीण दिसते.

निजलिंगप्पांनीही सध्या प्रधानमंत्राणींवर समोरासमोर गोळीबार तहकूब ठेवला आहे. परंतु उत्तर प्रदेशच्या दौऱ्यावरून राजधानीत परतल्यावर त्यांनी काल पत्रकारांना मुलाखत दिली. तेव्हा 'व्यक्ति-माहात्म्य विरुद्ध शिस्त' हे 'थीम-सॉंग' आळवलेच. अप्पांशी झालेल्या गप्पांचा सारांश: आरोप-प्रत्यारोपांची सध्या चाललेली खैरात योग्य नाही, उचित नाही अन् इष्टही नाही. कार्यकारिणीच्या बैठकीत या आरोपांचा समाचार घेऊ. समाजवादी ध्येयाशी कुठल्याच काँग्रेसमनचा मतभेद नाही, मग एखाद्या कुत्र्याला पिसाळलेला ठरवून ठार मारण्याचा हा खटाटोप का? राजकारण व्यक्तित्ववादी झाले आहे व व्यक्तींना अवास्तव महत्त्व मिळत आहे. काँग्रेसमध्ये भरपूर विचार-स्वातंत्र्य व उच्चार-स्वातंत्र्य आहे, पण शिस्त व एकी नसेल तर काँग्रेस जगणार कशी? उत्तर प्रदेशचा दौरा कसा काय झाला? "उत्तम." अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे जेथे गेलो तेथे – "अगदी टिचभर खेड्यातही" – एकच मत ऐकायला मिळाले: पक्षात शिस्तीची अंमल-बजावणी करा. बरे, बंगलोरच्या ए. आय्. सी. सी. अधिवेशनात राष्ट्रपती-पदा-साठी उमेदवार निवडण्यासाठी जी पद्धत अवलंबिण्यात आली ती चूक होती असे यशवंतराव चव्हाण म्हणाल्याचे म्हणतात त्याचे काय? उत्तर: "मला वाटते हा विषय पुरे करावा."

असो. एकूण सिंडिकेटी श्रेष्ठींचा सध्याचा पवित्रा असा आहे की प्रांतोप्रांती आपले सामर्थ्य किती आहे याचा नीट अंदाज येईपर्यंत, त्याचप्रमाणे आपल्या पोटातले मतभेद मिटेपर्यंत जैसे थे चालू ठेवावे. एकदा नीट डागडुजी झाली की मग इंदिराजींशी दुसरा सामना द्यायचा त्यांचा इरादा दिसतो.

## राष्ट्रपतीभवनाला झपाटणारे सदसद्विवेकबुद्धीचे भूत

दरम्यान इंदिराजींनी बाटलीतून बाहेर सोडलेले सदसद्विवेक बुद्धीचे भूत राष्ट्रपतीभवनालादेखील झपाटणार असे दिसते. कारण गिरींच्या निवडणुकीविरुद्ध आतापर्यंत एकूण पाच अर्ज दाखल करण्यात आले आहेत. त्यातला एक १८ विरोधी पक्षीयांनी मिळून केला आहे, तर एक १३ काँग्रेस-पक्षीयांनीही केला आहे.

निवडणुकीच्या वेळी 'गिरी'-जनांनी रेड्डींवर निरनिराळे आरोप करणारे एक पत्रक काढले होते, त्याचा प्रस्तुत अर्जात हवाला देण्यात आला आहे. हे पत्रक निवडणुकीपूर्वी निवडणूक-अधिकाऱ्यांना दाखविण्यात आले असता ते न्याय्य निवडणुकीच्या तत्त्वाला शोभणारे नाही असे त्यांनी मान्य केले होते. विशेष म्हणजे गिरींनी प्रस्तुत पत्रकाशी आपला संबंध नसल्याचे जाहीर केलेले नाही याचा अर्जात मुद्दाम उल्लेख करण्यात आला आहे.

## भाक्रांदच्या वाटाण्याच्या अक्षता

इंदिरा गांधींनी सिंडिकेटचे पारिपत्य केल्यानंतर ज्या नवीन घोषणा केल्य त्यातली एक प्रमुख घोषणा म्हणजे 'भूतपूर्व काँग्रेस जनहो, माघारे या!' हे आवाहन होते. हे जाहीर आमंत्रण मुख्यत: चरणसिंग आणि मंडळींना उद्देशून होते, कारण हीच मंडळी माघारी वळण्याची सर्वात अधिक शक्यता होती. परंतु गेल्या आठवड्यात दिल्लीला भारतीय क्रांतिदलाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक झाली. तिच्यात या सहर्ष आमंत्रणाला वाटाण्याच्या अक्षता लावण्यात आल्या. भाक्रांदने आपल्या नकाराची तीन सोपी कारणे दिली: पहिले म्हणजे काँग्रेस स्वत:च झपाट्याने कोलमडत आहे. दुसरे म्हणजे काँग्रेस व भाक्रांदमधले मतभेद तात्त्विक स्वरूपाचे आहेत. व तिसरे म्हणजे भाक्रांदचे बरेचसे सभासद मुळात काँग्रेसमध्ये नव्हतेच, तेव्हा त्यांनी काँग्रेसमध्ये 'परत' जाण्याचा प्रश्न येतो कुठे? एकूण इंदिराजींच्या आवाहनाला प्रथमग्रासे मक्षिकापात झाला म्हणायचा.

भाक्रांदच्या विचार मंथनातून निघालेली आणखी काही रत्ने:

जनसंघ, स्वतंत्र, प्रसोपा इत्यादींबरोबर विलीनीकरणाच्या गोष्टी आता बंद, कारण भाक्रांदच्या या खटपटीचा 'गैर अर्थ' लावण्यात आला आहे. काळ आला असला तरी अजून वेळ आलेली दिसत नाही. तस्मात् एकला चालोरे!

राष्ट्रपती-निवडणुकीत ज्या भाक्रांद्यांनी क्रॉस व्होटिंग केले त्यांच्याविरुद्ध कारवाई नाही. प्रस्तुत प्रकरणी पक्षाने 'चाबूक' उगारला नव्हता. तेव्हा हे क्रॉस व्होटिंग म्हणजे फक्त 'तांत्रिक गैरशिस्त' होय.

गेले काही दिवस ऑल इंडिया रेडियोचा हुकूमशाही पद्धतीने दुरुपयोग होत आहे. शेम, शेम! काही मोठ्या वर्तमानपत्रांनाही जाळ्यात ओढण्याच्या कारवाया चालू आहेत.

भारतीय राजकारणात परदेशी पैसा जो हैदोस घालीत आहे त्याला आळा घालण्यासाठी एखादी 'फुलप्रूफ' पद्धत शोधून काढली पाहिजे.

## जनसंघाचे मधोक-मर्दन

जनसंघातले बलराज मधोक प्रकरण सध्या "जाहीर भाषणे करताना सांभाळून बोलत जा," एवढ्या तंबीवर थांबले आहे. पक्षाच्या केंद्रीय संसदीय समितीच्या

पुरंदऱ्यांची दौलत
पुरंदऱ्यांची नौबत

मूल्य । साडेतीन रुपये
ब. मो. पुरंदरे
राजहंस प्रकाशन

बैठकीला मधोक हट्टाने गैरहजर राहिले होते तरी इतर सर्व सहा सदस्य हजर होते व सर्वांनी या तंबीला पाठिंबा दिला हे विशेष. मधोकांच्या विरुद्ध अधिक काही कारवाई होणार नसली तरी त्यांच्या विरुद्ध पास झालेल्या ठरावाची काहीशी कडक भाषा पाहता जनसंघाने अनुशासनाचे असिधाराव्रत चालू ठेवण्याचे ठर-विलेले दिसते.

मधोकांना ज्या दोन गोष्टींमुळे समज देण्यात आली तेवढीच बबनावाची कारणे होती काय ? नाही. ठराव प्रसिद्ध करताना पक्षाचे चिटणीस सुंदरसिंग भांडारी म्हणाले: मधोक व 'पक्षनेते' यांच्यातला मतभेद गेले बरेच दिवस निरनिराळ्या गोष्टींवरून वाढत चालला होता. उदाहरणार्थ : केंद्रीय सरकारच्या कर्मचाऱ्यांच्या संपाला नेत्यांनी पाठिंबा दिला होता, तर मधोकांनी विरोध केला होता. उलट मुंबईच्या जनसंघ–अधिवेशनात पक्षाने स्वतंत्र तेलंगणाविरुद्ध ठराव केला होता, तर मधोकांनी त्याचा पुरस्कार केला होता.


भांडारी म्हणाले: मधोकांना देण्यात आलेली समज ही मतभेदाबद्दल नसून तो चव्हाटयावर मांडण्याबद्दल आहे. कार्यकारिणीच्या अथवा संसदीय समितीच्या बैठकीत आपापली मते मांडायला कोठलीच आडकाठी नाही. बरे, आता पुढे काय होणार ? भांडारींचे उत्तर : ते मधोकांनी ठरवायचे.

सगळ्याच पक्षांची राजधानीत खलबते चालली आहेत, मग लालभाई मागे कसे राहतील ? साम्यवादी पक्षाच्या केंद्रीय सचिवालयाची बैठक नुकतीच दिल्लीला झाली. तिच्यात अहमदाबादेच्या हत्याकांडाबद्दल हळहळ व्यक्त करण्यात आली व लगेच पुस्ती जोडण्यात आली–'याला जबाबदार जनसंघ !'

— अनामिक

## इंदिरा सूक्ती....

येथल्या प्रेसक्लबमध्ये नुकतीच इंदिरा-पत्रकार प्रश्नोत्तरी झाली तेव्हा एकाने विचारले, "मोरारजी म्हणतात जगजीवनरामांनी दहा वर्षे इन्कम-टॅक्स भरला नाही. हे कसे काय ?" बाईंचा लाजवाब जबाब: "विसरले असतील; पण एवढ्या बिझी माणसाला आठवण करून देणे सरकारचे कर्तव्य नाही काय ?"



# ऑपरेशन दिंडोशी

लेखक : डॉ. गोपाळ राणे

आपला देश स्वतंत्र होऊन आज २२ वर्षे झाली. पण मलभूत गरजांबाबत अजूनही आपण परकीय मदतीवर अवलंबून आहोत. दर वर्षी पी. एल् ४८० खाली अमेरिकेकडून आपण तीनशे साडतीनशे कोटी रुपयांचे अन्न आयात करीत आहोत. हिंदुस्थान स्वतंत्र झाला त्यावेळेस एक धनको राष्ट्र होता. १८०० कोटीची गंगाजळी आपल्या नावे इंग्लंडजवळ होती. पण तिचा विनियोग आर्थिक विकासासाठी करण्याऐवजी आपण अन्नधान्य आयात करण्यात घालविला असून आता देशावर परकीय कर्जाचा बोजा सारखा वाढत आहे आणि तो इतका वाढत आहे की कर्जावरील व्याज देण्यासाठी अवमूल्यनासारख्या, राष्ट्राची आर्थिक पत घालविणाऱ्या अटी पत्करून, नवी कर्जे काढावी लागत आहेत. आणि अशीच परिस्थिती चालू राहिली तर ईस्ट इंडिया कंपनीसारख्या एका व्यापारी कंपनीने ह्या खंडतुल्य देश हा हा म्हणता घशात घातला तसा संपूर्ण त्या अर्थाने नव्हे तर आपल्या राजकीय धोरणावर वर्चस्व ठेवून अमेरिका ह्या देशावर वर्चस्व गाजविल्याशिवाय राहणार नाही. तेव्हा आपला देश खऱ्या अर्थाने स्वतंत्र ठेवावयाचा असेल तर आपल्या मूलभूत गरजांबाबत विशेषत: अन्नधान्याबाबत आपण स्वावलंबी व स्वयंपूर्ण होणे

आवश्यक आहे. ह्याचाच अर्थ म्हणजे आपण आपले उत्पादन वाढविले पाहिजे. उत्पादनाशिवाय ह्या देशाला तरणोपाय नाही. सुप्रसिद्ध समाजवादी नेते कै. डॉ. राममनोहर लोहिया म्हणाले होते की पाश्चिमात्य समाजवादाचा आधार, निर्माण केलेल्या संपत्तीचे न्याय्य विभाजन होता तर भारतीय व इतर पौर्वात्य मागासलेल्या देशांतील समाजवादाचा आधार उत्पादन व तोही अधिक क्षमतेने राहणार आहे. त्यातही त्यांनी अन्नोत्पादनाला प्राधान्य दिले होते कारण त्यांच्या म्हणण्याप्रमाणे अन्न ही आपली मुख्य गरज आहे. आपला ग्रामीण भागातला बहुसंख्य उत्पादक अज्ञानी व दरिद्री आहे इतकेच नव्हे तर तो शरीराने सुद्धा दुबळा, अशक्त व म्हणून अक्षम आहे; आणि म्हणूनच त्यांनी स्वातंत्र्याच्या सुरुवातीस अन्नोत्पादन मोहिमेचा व त्यासाठी तरुणांची भूसेना उभारण्याच्या कल्पनेचा आग्रह काँग्रेसमध्ये धरला होता. पण श्री. नेहरूंनी त्या कल्पनेचा उपहास केला होता आणि त्याचे परिणाम आपण आज भोगतो आहोत.

आज शेतकीशास्त्रात आंतरराष्ट्रीय स्तरांवर अन्नोत्पादन क्षमता वाढविण्याच्या दृष्टीने फार मौलिक संशोधन झाले असून अधिक पीके देणारी बियाणे उपलब्ध होऊ लागली आहेत. ह्यापुढे शेती हा व्यवसाय पूर्णपणे निसर्गाच्या लहरीवर अवलंबून न ठेवता त्याचे शास्त्र बनविण्याइतकी परिस्थिती निर्माण झाली आहे. आपल्या देशात अशा प्रयोगाना सुरुवात झाली असून काहींनी त्यात यश मिळविले आहे. पण त्यात बहुतांशी काही व्यक्तींचे प्रयत्न आहेत. त्याला अजून व्यापक स्वरूप येत नाही. किंवा त्याला विरोधच होत आहे असे म्हटल्यास फारसे चूक होणार नाही. सरकारी पातळीवर प्रयत्न चालू आहेत पण त्यांचा कसा बट्ट्याबोळ होतो ते पुण्याच्या गोखले इन्स्टिटयूटने तायचूंग नेटिव्ह–१ प्रकारच्या भाताच्या लागवडीसंबंधी महाराष्ट्र सरकारने केलेल्या प्रयोगासंबंधी अहवाल तयार केला आहे तो वाचल्यास चटकन लक्षात येईल. सरकारच्या गलथानपणामुळे असे प्रयोग फसतात आणि त्याचा परिणाम आज महाराष्ट्रात नव्या पद्धतीच्या शेतीला ठिकठिकाणी विरोध होऊ लागला आहे.

पण अधिक धान्योत्पादन मोहिमेत सर्वात मोठा विरोध राहणार आहे तो ज्याच्या आधारे आपण अन्नोत्पादान वाढविणार आहोत त्या खुद्द शेतकऱ्याचा. आपला शेतकरी अज्ञानी, शास्त्रीय दृष्टिकोनाचा अभाव असलेला, दैववादी किंवा नक्षत्रवादी असून कोणत्याही नवीन कल्पनांना विरोध करणारा आहे. पण आपल्या उत्पादनमोहिमेत अशा शेतकऱ्यांपर्यंत नवा शास्त्रीय दृष्टिकोन व नव्या शास्त्रीय-पद्धती नेण्याशिवाय गत्यंतर नाही. फक्त पगारासाठीं काम करणाऱ्या सरकारी नोकरांकडून हे काम होण्यासारखे नाही. कारण कोणत्याही चांगल्या कल्पनांचे व योजनांचे अशा लोकांकडून काय होते ते आपण पाहतोच. राजकीय पक्षांना हे काम हाती घेण्यासारखे आहे. निदान डॉ. लोहियांचा वारसा घेऊन पक्ष चालविणाऱ्यांनी

तरी करावे. पण तसे काही सुचिन्ह दिसण्यात येत नाही.

हे कार्य एकटयादुकटयाचे नसून जसे संघटितपणे करण्यासारखे आहे, तसेच नव्या तंत्राबरोबर नवा दृष्टिकोन, नवी शास्त्रीयवृत्ती (Scientific outlook) आपल्या उत्पादकांत निर्माण होणे आवश्यक आहे. म्हणजे थोडक्यात त्याचे 'प्रबोधन' होणे जरूर आहे. ह्या दोन्ही गोष्टी एकमेकांवर इतक्या अवलंबून आहेत की त्यांत एक झाल्यावर नंतर दुसरी असे न करता त्या एकाच वेळी झाल्या पाहिजेत. आणि म्हणून 'अधिक उत्पादना'च्या मोहिमेला सामाजिक प्रबोधनाच्या चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले पाहिजे. हे चळवळीचे काम तिशीच्या आतील तरुणच करू शकतील. आपल्याकडील अस्वस्थचित्त तरुणांची, विशेषतः ग्रामीण भागांतील नवशिक्षित विद्यार्थ्यांची व ह्या चळवळीची आपण सांगड घालू शकलो तर देशांतील एका नव्या क्रांतीला सुरुवात होईल आणि त्यांतून एक नवा कायापालट झालेला समाज निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही. म्हणून युवक चळवळीला 'सामाजिक प्रबोधना'ची वैचारिक बैठक देऊन तिला उत्पादनाभिमुख बनविण्याच्या उद्देशाने गेल्या वर्षी नव्हेंबरात उरळी कांचन येथे भरलेल्या युवक-क्रांति-दलाच्या शिबिरात गोरेगाव येथील समाजवादी विचाराचे, शेतीच्या नव्या तंत्रात यशस्वी झालेले शेतकरी श्री. र. गो. ऊर्फ आबा करमरकर, मुंबईच्या कीर्ती कॉलेजचे प्राचार्य मे. पुं. रेगे व प्रस्तुत लेखक या तिघांनी युवक चळवळी-संबंधी एका छोटया निबंधाद्वारे हा नवीन विचार मांडला. त्यांत मूलभूत कल्पना अशी की, हा जो नवीन शिक्षित पण न्यूनगंडाने पछाडलेला तरुण परत ग्रामीण भागात जावयास तयार नाही, त्यालाच ह्या नवक्रांतीचे नेतृत्व करावयास लावायचे आहे. तो पुन: खेडयांत जाणार आहे, पण खेडवळ म्हणून नव्हे; तर नवा दृष्टिकोन, नवे उत्पादन तंत्र घेऊन जाणारा पाईक म्हणून जाणार आहे. अशा तरुणांना शास्त्रीय दृष्टिकोन व उत्पादनाचे नवे तंत्र दोन किंवा तीन एकरवाल्या शेतकऱ्या-पर्यंत जसे न्यावयाचे आहे तसेच त्या शेतकऱ्यावर होणाऱ्या अन्यायाविरुद्धसुद्धा झगडावयाचे आहे. आपल्याला समाजात काही स्थान नाही अशा मनःस्थितीत असलेल्या ह्या ग्रामीण नवयुवकांच्या वृत्तीत आपल्या प्रयत्नाने शेतीच्या उत्पादनांत वाढ झाल्याचे आढळताच क्रांतीकारक बदल झाल्याशिवाय राहणार नाही. आपणही काही चांगले करू शकतो ह्या जाणीवेने त्याचा गेलेला आत्मविश्वास त्याला परत मिळण्यास मदत होणार आहे. शहरी विद्यार्थ्यांच्या दृष्टीने सुद्धा अशा प्रकारची युवक चळवळ उपयुक्त ठरणार आहे. आज विश्वविद्यालयातर्फे विद्यार्थ्यांची 'श्रमदान' शिबीरे आयोजित केली जातात अनेक विद्यार्थी त्यात भाग घेतात. पण तेथे जे काम केले जाते त्याला एक गंमत किंवा एक आधुनिक शैक्षणिक 'टूम्' यापलीकडे फारसे महत्त्व प्राप्त होत नाही. ह्यातुन विद्यार्थ्यांना नवी दृष्टी प्राप्त होत नाही, देशाच्या परिस्थितीची व त्यासंबंधीच्या कर्तव्याची जाण निर्माण होत नाही.

तेव्हा प्रत्यक्ष उत्पादनाच्या कार्याशी त्यांना निगडीत केले व त्या अनुषंगाने आर्थिक, सामाजिक समस्यांचे आपण दर्शन घडविले तर त्यांना प्रत्यक्ष कृतीचा आनंद तर मिळेलच पण आपण केलेल्या कामाचे पुढे 'काय झाले' ह्याची उत्सुकता कायम राहून ह्या प्रश्नांसंबंधी अधिक विचार करण्यास प्रवृत्त केले जाईल.




पण ज्या समाजात अश्रद्ध-वृत्ती (Cynicism) वाढली आहे तेथे नुसते विचार सांगून भागत नाही. ह्या विचाराचा प्रसार करण्याच्या दृष्टीने आम्ही मे महिन्याच्या सुटीत युवक क्रांती दलाची जी शिबीरे झाली त्यात सामाजिक प्रबोधन व उत्पादनाभिमुख युवक चळवळीचा आमचा दृष्टिकोन मांडला व त्यासंबंधी ग्रामीण तरुणात अनुकूलता ही दिसून आली. तेव्हा प्रत्यक्ष असा प्रयोग कुठेतरी केला पाहिजे म्हणून आम्ही आमच्या आवाक्यात राहील असा एक छोटासा प्रयोग विद्यार्थ्यांचा प्रतिसाद कितपत मिळतो हे पाहण्यासाठी करण्याचे ठरविले व त्यासाठी मुंबई नजीक बोरिवली तालुक्यांतील दिंडोशी व मागाठाणे ही क्षेत्रे निवडली. दिंडोशी हे गाव गोरेगांव स्टेशनपासून एक मैलाच्या अंतरावर सीबा संशोधन केंद्राच्या पाठीमागे असून तेथे ह्या नव्या विचाराचे व प्रयोगाचे प्रवर्तक श्री. र. गो. ऊर्फ आबा कामेरकर यांची डेअरी व शेतजमीन आहे. त्यांची डेअरी आदर्शवत असून नियोजनाच्या शास्त्रशुद्ध पायावर आपला दुधाचा धंदा त्यांनी उभारला आहे. आरे गौळीवाड्यांतील म्हशींपेक्षा त्यांच्या म्हशी १४०% दूध अधिक देत असतात. त्या शिवाय सामान्यत: आपल्या येथील कोणत्याही धंद्यात अभावाने आढळून येणारे 'कॉस्टिंग' त्यांनी दुग्ध व्यवसायात करून दाखविले आहे. १९४२ च्या भूमिगत आंदोलनात ते खऱ्या अर्थाने अज्ञात होते. त्यांचे गोरेगावांतील घर जयप्रकाश

[पृष्ठ ६२ वर]

दादूमियांनी स्वातंत्र्यदिन विशेषांकात तेलंगण सादर केला. त्यानंतर प्रा. नरहर कुरुंदकर यांनी त्यातील एका विधानाबाबत खुलासा पाठविला, तोही 'माणूस'मध्ये येऊन गेला. या विषयाचा वेध घेणारा हा आणखी एक लेख.

लेखक : प्राध्यापक प्रमोद लाळे

प्रा. लाळे यांचे सर्व महाविद्यालयीन शिक्षण पुणे येथे झाले. विषय संस्कृत. सर्व परीक्षात उच्च यश संपादन करून ते नोकरीनिमित्त दहा वर्षांपूर्वी हैदराबादकडे गेले व आजही त्यांचे वास्तव्य तिकडेच आहे. तेलगु भाषाही त्यांनी उत्तम आत्मसात केलेली आहे. या जवळिकीमुळे त्यांनी तेलंगण प्रश्नाचा केलेला हा उहापोह मराठी वाचकांना खासच विषयाच्या थोडे अधिक समीप घेऊन जाईल. नाही तरी तेलंगण प्रश्न आता पुन्हा धसाला लावण्याच्या हाल-चाली सुरूच आहेत.

१९५६ मध्ये भाषाविषयक विभजनाच्या कायद्यानंतर जुन्या हैदराबाद राज्याचे तीन विभाग केले गेले व ते तीन संलग्न प्रांतांना जोडले गेले. तदनुसार तेलंगणाचे ९ व जुन्या आंध्रचे ११, असे २० जिल्हे जोडून एक आंध्र प्रदेश राज्य बनविण्यात आले. फाजलअली कमीशनच्या रिपोर्टमधील ३२९ व्या कलमामध्ये तेलंगण हे स्वतंत्र राज्य होऊ शकते, असे सांगितले आहे. त्यात असेही सांगितले आहे की उभय विधानसभांच्या २/३ सभासदांची जर संमती असेल तर तेलंगण व आंध्र दोन्ही राज्ये एक करावीत. पण या रिपोर्टात नंतर बरीच जोडतोड करण्यात आली व तेलंगणास कोठलाही अवधी न देता लगेच २० जिल्ह्यांचे आंध्र प्रदेश राज्य बनविण्यात आले. याच वेळी एक शिष्टसंमती (Gentlemen's Agreement) प्रसिद्ध करण्यात आली. त्यावर काही आंध्र व तेलंगण यातील नेत्यांच्या सह्या होत्या. त्या संमतीनुसार तेलंगणाला १० वर्षे-पर्यंत मुल्की नियम इत्यादी सवलती देण्याचे उभयविभागातील लोकांनी मान्य केले. संमती अर्थातच वैधानिक नव्हती; परंतु त्यातील तत्त्वे गोडीगुलाबीने दोन्ही प्रांतातील लोकांनी अमलात आणावीत आणि तशी ती अमलात आणली जात आहेत, हे सरकारने पहावे, असे ठरले.

# पुन्हा एकदा तेलंगण

आंध्र प्रदेश निर्माण झाला व त्याची राजधानी कर्नूलच्या ऐवजी हैदराबाद झाली. अनेक ऐतिहासिक अथवा भौगोलिक कारणांमुळे हैदराबाद शहराची वाढ एका भाषेतील पातळीवर झाली होती. जुन्या हैदराबाद राज्यात ५ भाषिक गट रहात होते. विभाजनानंतर जरी हैदराबाद शहरात तेलगु लोकांची एकसंघ बहुसंख्या झाली, तरी इतर भाषिक (विशेषतः उर्दू–मराठी–तामिळ भाषिक) काही नगण्य नव्हते. हैदराबाद शहरात सर्वच लोक आनंदीत होते. तेलंगणातील सीमावर्ती जिल्ह्यामध्ये मराठी-तेलुगु, मराठी–कानडी, कानडी–तेलुगु असे आंतरभाषिक विवाह होत असत व अद्यापीही होत आहेत. या विवाहांमुळे कौटुंबिक आणि सामाजिक आचार-विचारांमध्ये बरेचसे आदान–प्रदान घडले व तेलंगणीय आचार-विचार हे आंध्र, महाराष्ट्र, कर्नाटक यांच्या तत्कालीन आचारविचारांचे मिश्रण या वैशिष्टयाने निराळे दिसू लागले. या तेलंगणातील लोकांचे जेव्हा न्यूनाधिक एकसंघ, एकरंग आणि एकतंत्र तटवर्ती आंध्रांशी शासनिक संबंध येऊ लागले, तेव्हा भाषिक साम्यापेक्षा आचार-विचार वैधर्म्यच अधिक स्पष्ट होऊ लागले. कृष्णा-गोदावरी-गुंटुर जिल्ह्यातील लोकांची भाषा तेलुगुच, हैदराबाद-वरंगळ नलगोंडा आदि लोकांची भाषाही तेलुगुच. पण आंध्र प्रांतीय तेलुगुवर इंग्रजीचा प्रभाव अधिक तर तेलंगणच्या तेलुगुवर उर्दूचा प्रभाव अधिक. सीमा प्रांतातील तेलुगु भाषेवर मराठी किंवा कन्नड वाक्प्रचारांचाही प्रभाव दिसून येतो. आंध्रातील तेलुगु लोकांनी राज्यकारभाराच्या ज्ञानाचा वारसा तामिळ लोकांकडून घेतला तर तेलंगणातील लोकांनी मराठेशाहीकडून किंवा मुस्लिम 'शाह्यां'कडून. हे सांगावयाचा उद्देश एवढाच आहे की स्वतंत्र संमिश्र सभ्यतेचा अभिमान बाळगणाऱ्या तेलुगु लोकांना आंध्र लोकांशी थोडयाशा अनिच्छेनेच हातमिळवणी करावी लागली हे स्पष्ट करणे. अर्थात १९५६ साली ज्यावेळी भाषावार पुनर्रचनेचा प्रश्न

निर्माण झाला, त्यावेळी भाषिक समता प्रामुख्याने मानावी, हे तत्त्व दोघांनीही कबूल केले. मुस्लिम राजवट (मुसलमान नव्हे) व कम्युनिस्ट यांनी गांजल्या गेलेल्या तेलंगणातील जनतेने किंवा नेत्यांनी म्हणा – आपल्या लाडक्या संमिश्र संस्कृतीची कवाली गाण्याचे बंद करून आंध्र प्रदेशातील ऐक्याचे यक्षगान गाण्यास सुरुवात केली.

या पार्श्वभूमीवर तेलंगणातील सद्य:स्थितीचा विचार आपण केला पाहिजे. आंध्र प्रदेशाच्या निर्मितीनंतर तटवर्ती (अर्थात् या संज्ञेत रायलसीमेच्या ४ जिल्ह्यांचा समावेश होतो) प्रदेशांतील असंख्य उद्योगेच्छु आणि उद्योगशील लोक हैदराबाद आणि इतर जिल्ह्यांच्या ठिकाणी आले. हैदराबाद राजधानीचे शहर होते. शिक्षण, निवारा, इत्यादी सर्व सोयींनी सुसज्ज असे एक आकर्षक शहर होते. आंध्र नेत्यांच्या प्रयत्नामुळे Heavy Electricals, Synthatic Drugs Factory, Indian Aeronautics इत्यादी केंद्रीय शासनाधीन बरेच कारखाने हैदराबादच्या परिसरात निर्माण झाले. राजधानीच्या शहरामुळे दररोज शेकडो लोक शहरात येऊ लागले. गृहसमस्या निर्माण झाली. पण आंध्रमधील सधन लोकांनी रिकाम्या पडलेल्या जमिनी किंवा पूर्वीच्या नबाबांच्या जहागिरीच्या पडीक जमिनी भराभर विकत घेतल्या व अक्षरशः हजारो नवीन घरे बांधली. आंध्रच्या हुशार जमीनदार वर्गाने हैदराबादच्या आसपास नापीक जमिनीत द्राक्षांची मोठ्या प्रमाणावर लागवड केली. निजामाबादसारख्या जिल्ह्यात ऊस आणि तांदूळ यांची उत्पत्ती अमाप झाली. सरकारी नोकरशाही आणि खाजगी उद्योगधंदे यामध्येही आंध्र विभागीय लोकांची भरती सुरू झाली. सुरुवातीला तेलंगणातील लोकांना या प्रगतीचे आश्चर्य वाटले, ते मुग्धही झाले. आपलेच भाषिक बांधव आपल्या विभागात पैसा ओतीत आहेत व 'संजाराभूमि'चे सुवर्णभूमीत रूपांतर होत आहे, हे पाहून त्यांच्या डोळ्याचे पारणे फिटले असेल, यात शंका नाही.

पण समृद्धीच्या दिव्याखाली असंतोषाचा अंधार आपले पंख पसरीत होता. तेलंगणाची भरभराट आंध्रातील लोक करीत आहेत त्याचे श्रेय सर्वस्वी 'बाहेरच्या' लोकांना मिळत आहे हे काही 'मुल्की' व्यापाऱ्यांना आणि 'निराशाग्रस्तांना' बोचू लागले. काही विशिष्ट जमातीचे व्यापारिक प्राबल्य कमी होऊ लागले व त्यांचा असंतोष अनेक खाजगी संभाषणांतून व क्वचित् स्थानीय वर्तमानपत्रांतूनही डोके काढू लागला. १९५६ नंतरची काही वर्षे त्याला खाजगी स्वरूप होते. पण हितसंबंधी लोक त्याला चव्हाट्यावर आणण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होते. मुल्की नियम कसोशीने पाळले जात नाहीत व बाहेरची माणसे पैशाच्या जोरावर खोटी (Faked) प्रमाणपत्रे मिळवून व आपल्या ओळखीचा गैरफायदा घेऊन नोकऱ्या पटकावीत आहेत व त्याच जागांसाठी समान प्रवीणता असलेल्या तेलंगणातील लोकांना मात्र नोकऱ्या मिळत नाहीत, ही एक बळकट तरफ त्यांना

मिळाली. एका बाजूने व्यापारी व दुसऱ्या बाजूने निरुद्योगी अशा कचाटीत आंध्र प्रदेश सरकार सापडले. अनेक ठिकाणी त्यांना आरोपाची सत्यताही दिसून आली. तेव्हा १९६८ नंतर समाप्त होणारा मुल्की नियमांचा अवधी भारतीय लोकसभेने आणखी पाच वर्षांनी वाढविला. तरीपण संबंधित लोकांचा आपल्यावर अन्याय झालेला आहे, ही भावना अंशतःही दूर झाली नाही.

## चळवळीस प्रत्यक्ष प्रारंभ

१९६८ मध्ये कोत्तगुडम् येथील रासायनिक द्रव्यांच्या कारखान्यात काही कारणावरून कामगारांमध्ये बाचाबाची झाली. काही लोकांना 'मालकांनी' 'अतिरिक्त' म्हणून काढून टाकले. कपातीची ही झळ दुर्दैवाने तेलंगणातील लोकांवर बसली. आंध्र अधिकारी हे अन्याय बुद्धिपूर्वक करीत आहेत आणि त्यांच्या मनात केवळ शोषकवृत्तीच (Exploitation) आहे, असा समज तेलंगणातील नोकरवर्गात रूढ होऊ लागला. कामगारांतील असंतोषाची ठिणगी दारुगोळ्याचे जणू काय कोठारच, अशा विद्यार्थीसंघटनांत जाऊन पडली. प्रथमप्रथम खम्मम येथील विद्यार्थ्यांनी 'तेलंगणास न्याय हवा' असें उद्घोषीत करून उपोषणास सुरुवात केली. त्याला उस्मानिया विद्यापीठ व अनुबाधित सर्व महाविद्यालये, यातील विद्यार्थीनेत्यांनी सहानुभूती दाखविली. याच सुमारास उस्मानिया विश्वविद्यालय विद्यार्थीसंघाच्या अधिकारपदासाठी निवडणुका झाल्या.

हे होता होता १९६९ चा जानेवारी महिना आला. उपर्युक्त निवडणुकात अनेक राजकीय पक्षांनी प्रच्छन्नपणे भाग घेतला. विशेष म्हणजे सत्तारूढ पक्षाच्या विचारास अनुकूल असणारे अनेक नेते निवडणुकीत पराभूत झाले. निवडून आलेल्या विद्यार्थ्यांतही नंतर फूट पडत चालली, सत्तारूढ पक्षाच्या समर्थक विद्यार्थ्यांनी उपोषण करणाऱ्या विद्यार्थ्यांस पाठिंबा दिला व तेलंगणास जे खास हक्क (Safeguards) दिले गेले होते, त्यांची अंमलबजावणी कसोशीने व्हावी, अशी मागणी केली. त्यांना विरोध करावयाचा म्हणजेच तदितर विचारांचा कैपक्ष घ्यायचा या हेतूने विजयी विद्यार्थीनेत्यांनी स्वतंत्र तेलंगणाची मागणी पुढे केली. सबंध जानेवारी महिन्यात दोन्ही पक्ष आपल्या बलाबलाचा अजमास घेत होते. याचवेळी फ्रान्समधील विद्यार्थ्यांची निदर्शने व त्यांचे परिणाम हा विषय हैदराबादमधील विद्यार्थ्यांच्या मनावर अगदी ताजा होता. दोघांनीही सार्वत्रिक संपाचे आव्हान दिले. 'तत्त्व मान्य, पण तपशील अमान्य' अशा थाटात परस्परविरुद्ध निदर्शने होऊ लागली. Seperatists व Safeguardists ही विशेषणे सर्वत्र ऐकू येऊ लागली.

परंतु स्वतंत्र तेलंगणवाद्यांचे बहुमत होत चालले होते. याचवेळी म्हणजे १९ जानेवारी १९६९ ला मुख्यमंत्री ब्रह्मानंद रेड्डी यांनी एक सर्वपक्षीय सभा बोलावून त्या सभेत तेलंगणावर आतापर्यंत अन्याय झाला आहे, ही गोष्ट कबूल केली व तसा अन्याय परत होणार नाही, याबद्दल काळजी घेतली जाईल इतकेच नव्हे तर

तेलंगणात नोकरी करणाऱ्या काही अराजपत्रित नोकराना आंध्रमध्ये पाठविण्याची व्यवस्था करण्यात येईल असे जाहीर केले व त्यावर सर्व पक्षातील नेत्यांच्या सहीचे शिक्कामोर्तब करून घेतले. कदाचित् यानंतर चळवळ थंड झाली असती.

पण याच वेळी आंध्रविभागीय कांही नोकरांनी स्थानांतरीकरणास (Repatriation) विरोध दाखविला व आपले गाऱ्हाणे Supreme Court कडे नेले व आश्चर्यकारक क्रियाशीलता दाखवून सुप्रीम कोर्टाने मुल्की नियम अवैध घोषित केले. (यासंबंधीचे परस्परविरुद्ध निर्णय हायकोर्टाने दिले होते.)

यानंतर तेलंगण चळवळीला खरा जोर चढला. मुल्की नियमांची काठी देखील निसटून गेली. यामागे मुख्यमंत्र्यांचा कावेबाज डाव आहे, अशीही टीका करण्यात आली. आतापर्यंत तेलंगण चळवळ विद्यार्थ्यांपुरतीच मर्यादित होती व ती बऱ्याचशा शांत मार्गांनी चालली होती. किंबहुना फेब्रुवारीपर्यंत विद्यार्थ्यांनी जो उपोषणाचा मार्ग अवलंबिला तो बराच शांततावादी होता. सुरुवाती सुरुवातीला ही चळवळ इतकी शांत कशी याचेच आश्चर्य सर्वांना वाटले. खम्मम् व वरंगळ येथील लोण सर्व तेलंगणात पोचले.

काही दिवसांनी तेलंगण भागातील एक मंत्री श्री. कोंडा लक्ष्मण बापूजी यांनी आंशिक स्वायत्ततेची कल्पना मांडली व ती दिल्लीच्या नेत्यांच्या गळी उतरविण्याचा प्रयत्न केला. त्यात ते यशस्वी झाले नाहीत. त्यांनी मंत्रीपदाचा राजीनामा दिला व स्वतंत्र तेलंगण कॉंग्रेस कमिटी स्थापित केल्याचे जाहीर केले. याचवेळी इतर काही नेत्यांनी स्वतंत्र तेलंगणच्या मागणीचा पुरस्कार केला. सर्वात कडी म्हणजे इतके दिवस केवळ हक्कांची व तत्सदृश भाषा बोलणारे निवृत्त केंद्रमंत्री डॉ. चेन्ना रेड्डी यांनीही चळवळीला आपला पाठिंबा जाहीर केला. अशा रीतीने मार्च महिन्यात दोन प्रमुख कॉंग्रेस नेत्यांनी तेलंगण चळवळीत भाग घेण्यास सुरुवात केली. त्याचवेळी संयुक्त समाजवादी पक्षाचे धनिक नेते श्री. बद्रीविशाल पित्ती यानीही पक्षाच्या निदेशास झुगारून स्वतंत्र तेलंगण स्थापनेसाठी दंड ठोकले. या नेत्यांच्याबरोबर त्यांचे अनुयायीही चळवळीत उतरले; इतकेच नव्हे तर अशा तऱ्हेच्या आंदोलनाला लागणारे द्रव्यसाहाय्यही त्यांच्या पाठोपाठ भरपूर आले. अनेक व्यापाऱ्यांकडून सक्तीने किंवा खुषीने निधी वसूल केला गेला. अर्थात् अज्ञात ठिकाणाहून येणाऱ्या द्रव्यसाहाय्याची कल्पना करणेसुद्धा फारसे वावगे ठरणार नाही.

नंतर एप्रिलमध्ये तिसरे पर्व सुरू झाले; व येथून घातपाती कृत्यांना प्रारंभ झाला. विद्यार्थीनेते व राजनैतिक पुढारीही त्यांच्या मनाच्या विरुद्ध चाललेल्या गुंडगिरीस थांबवू शकले नाहीत. ही गुंडगिरी उभयपक्षांनी केली, हे मोठ्या खेदाने सांगावेसे वाटते. स्थानीय पोलिस काही विशिष्ट (!) कारणांमुळे ही गुंडगिरी थांबवू शकत नाहीत, हे कळताच सरकारने बाहेरचे पोलिस बोलाविले. जेव्हा पोलिसांनी कडक धोरण स्वीकारले, त्या वेळी पोलिसांच्या अत्याचाराची ओरड करण्यात

झाली. चकमकीत दोन तुकड्यांच्या घर्षणाने आग निर्माण होते त्या वेळी कोठल्या तुकड्यावर घर्षण अधिक झाले, हा प्रश्न गौण ठरतो.

निषेधार्थ बंद–हरताळ, काळा दिवस इत्यादी अनेक प्रकारांनी नेत्यांनी पोलिस अत्याचारांचा निषेध केला. यामुळे शृंखलीय प्रतिक्रिया निर्माण झाली. गुंडगिरी–पोलिस कृती–हरताळ–गुंडगिरी–पोलिस कृती यांना अंतच राहिला नाही. हे चालू असताच अनेक थंड माथ्याच्या लोकांनी पत्रके काढून अभग्न आंध्र प्रदेशाचे महत्त्व पटवून द्यावयाचे प्रयत्न केले, परंतु त्यांचा युक्तिवाद केवळ आगीत तेल ठरला. १–२ महिने पत्रकांचेच झगडे (War of statements) चालू होते. शाळा-कॉलेजे २५ मार्चनंतर बंद पडली व मुलांचे मोठे गट निष्क्रियतेमुळे किंवा स्वस्थ न बसविल्यामुळे दगडफेक, टेलिफोन–वीजखांब उपटणे, प्रतिपक्षीयांच्या निवास-स्थानास आगी लावणे इत्यादी घातपाती कृत्ये करण्यात वेळ घालवू लागले.

हे सर्व चालू असता कॉंग्रेससह सर्व पक्षातील लोक पत्रके काढण्याव्यतिरिक्त फारसे काही करत नव्हते. मुख्यमंत्रीही याच्याव्यतिरिक्त प्रकटपणे तरी काहीच करीत नव्हते. विरोधी पक्ष (स्वतंत्रपक्ष सोडून) स्वतंत्र तेलंगणच्या विरुद्ध होते; पण तेही स्वतंत्र प्रतिपादन करण्यासाठी काही करीत नव्हते. सर्वांनाच दहशत बसली होती. कम्युनिस्टांच्या एका सभेत तेव्हा बराच गोंधळ झाला होता. त्या वेळेपासून


श्री. ना. ह. आपटे यांच्या कादंबऱ्यांची
नामवंत साहित्यिकांनी केलेली संक्षेपित व संपादित

**अक्षर-यात्रा**

( दहा संक्षिप्त कादंबऱ्यांचा संच )

सुखाचा मूलमंत्र, न पटणारी गोष्ट, साजणी, अपेक्षा, संधिकाल, एकटी, रजपुतांचा भीष्म, पहाटेपूर्वीचा काळोख, वैभवाच्या कोंदणात व कोणी कुणाचे नव्हे.

( प्रसिद्धी : जानेवारी १९७० )

**प्रसिद्धीपूर्व सवलतीचे मूल्य : रु. २५–००**

( प्रसिद्धीनंतर : रु. ४०·०० )

सर्व प्रमुख ग्रंथ-विक्रेत्यांकडे प्रसिद्धीपूर्व नोंदणी
दि. १५ ऑक्टोबर १९६९ पर्यंत चालू राहील.

हिंदुस्थान साहित्य, पुणे ३०

कोणताही पक्ष सभा घेण्यासही धजत नव्हता. शहरातून तेलंगणवाद्यांच्याच घोषणा व सत्याग्रह चालू होते.

या काळातील दोन गोष्टींसंबंधी मात्र फारच आश्चर्य वाटते. ४-५ महीने चळवळ चालू होती. अनेक निरपराध लोकांना उपद्रव पोचत होता; तरीपण काँग्रेस हाय-कमांडचे लोक मूग गिळून बसले होते. इंदिरा गांधी यांनी काही नेत्यांना दिल्लीला बोलावून वाटाघाटी केल्या; पण त्यांचा फोलपणा नेत्यांनी दिल्लीला जाताना हैदराबादच्या विमानतळावर आगाऊच दाखवून दिला होता. इतर केंद्रीय नेते गप्पच होते. ३ जूनच्या लज्जास्पद घटनांनंतर इंदिरा गांधी व यशवंतराव चव्हाण यांनी हैदराबादला धावत्या भेटी दिल्या; पण वाटाघाटीखेरीज काही केले नाही, एवढेच केले की ब्रह्मानंद रेड्डी यांना आपला पाठिंबा दाखविला व पोलिस अधिकाऱ्यांना अधिक कडक उपाय योजण्यास सांगितले. नेत्यांची धरपकड, नवीन नेत्यांचे चळवळ चालू ठेवण्याचे निर्णय आणि शाळा कॉलेजांचे बेमुदत बंद होणे – अशा तीन अनिष्ट परिणामांच्या झळांनी मे जूनच्या उन्हाळचास अधिकच असह्य बनविले.

दुसरी विशेष गोष्ट म्हणजे तेलंगणात ही चळवळ व हिंसाकांड चालू असताना आंध्र विभाग कमालीचा शांत होता व आहे. प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष आणि काही विरोधी पक्षांचे आंध्र विभागीय यांच्याखेरीज कोणीच तोंड उघडले नाही, तेलंगणातील गुंडगिरीचा साधा निषेधही कडकरीतीने कोणी केला नाही.

अलीकडील घटना ताज्या आहेत. तेलगणातील मंत्र्यांनी मुख्य मंत्र्यांनाच पाठिंबा देण्यासाठी राजीनामे दिले. परंतु तेलगण नेते त्यांना विशेष किंमत देत नाहीत. 'शेंडी तुटो, नाहीतर पारंबी तुटो' या अभिनिवेशाने तेलंगणचे नेते चळवळ पुढे चालविण्याचा निर्धार करीत आहेत.

या चळवळीमुळे आंध्र काँग्रेसमध्ये मोठेच भगदाड पडले आहे. तडकाफडकी निर्णय न घेणारे प्रसिद्ध नेते व तडकाफडकी निर्णय घेऊन घातपाती कृत्ये करणारे अज्ञान नेते – या दोघांचेही अस्तित्व आंध्र प्रदेशास काय, तर सर्व देशास विनाशक ठरणार आहे.

या सर्व विवेचनाचा थोडक्यात सारांश असा की तेलंगणच्या लोकांनी थोडयाशा अनिच्छेने का होईना आंध्रमध्ये विलीन होण्याची व एकत्रित रहाण्याची जी वृत्ती दाखविली होती, तिचा १२ वर्षांच्या अनियंत्रित शासनाने धुव्वा उडवून दिला. याचा फायदा सत्तारूढ पक्षाच्याच बंडखोर गटाने घेतला व स्वतंत्र तेलंगणची प्रलोभने दाखवून विद्यार्थ्यांना अनिश्चिततेच्या आणि उच्छृंखलतेच्या खाईत लोटले. हे होत असताना ज्यांनी आपली अगणित संपत्ती तेलंगणात गुंतविली आहे, अशा विभागीय उद्योगपतींनी, अधिकाऱ्यांनी किंवा नोकरांनी केवळ कुंठाग्रस्त होऊन, अवरुद्ध होऊन तेलंगणात वास करणारी आपली बायका – मुले आंध्रमध्ये पाठविण्या-व्यतिरिक्त काहीही केले नाही. पळणाऱ्यांच्या पाठीवर आसूड मारण्याचा घोर

आसुरी आनंद मात्र काही चळवळयांना मिळाला. हे सर्व प्रांतीय व केंद्रीय नेते पहात आहेत, पण तेही अगातिक आहेत, कुंठाग्रस्त आहेत, देशांतील अनिश्चित आर्थिक आणि राजकीय स्थितीमुळे ! त्यांनी दोन भावांतील भांडणात तडजोड करवून आणण्याचा वरवरचा प्रयत्नही केला नाही म्हणून दोषीही आहेत.

या कुंठित, अवरुद्ध अवस्थेत सर्व आंध्र प्रदेश. किंबहुना सर्वच देश असताना, पुढे काय, हा प्रश्न कधी नव्हता इतका जटिल झाला आहे. अशा तऱ्हेची चळवळ हिंदुस्थानात कधीच झाली नव्हती, असे डॉ. चेन्न रेड्डी यांचे म्हणणे आहे व ते खरे आहे; पण तटस्थवृत्तीने या प्रश्नाकडे पाहिल्यास काही प्रश्न मनास फारच त्रास देतात. तेलंगणावर जो अन्याय होत होता, त्याची १९६९ सालीच का जाणीव झाली ? तेलंगणचे ९ मंत्री १२ वर्षे मंत्रिमंडळात होते. १२ वर्षे तेलंगणची प्रादेशिक समिती अस्तित्वात होती. त्यांनीही प्रकटपणे अन्यायाला वाचा फोडली नाही ! आंध्रच्या लोकांनी खोटी मुल्की सर्टिफिकिटे देऊन नोकऱ्या पटकावल्या असे मानले तरीही शेवटी त्यांना ती Certificates देणारे काही अधिकारी तरी तेलंगणचेच होते ना ? आंध्रांनी उद्योगधंद्यांत व कृषि–उद्योगात फार प्रगति केली व पैसे गुंतविले–ही तर तेलंगणावरची इष्टापत्तिच समजली पाहिजे !

अनेक आंध्रांचे अंतःकरणाचा ठाव घेण्याचा प्रयत्न केला तर त्यांनाही काही अभंग आंध्र प्रदेशासंबंधी प्रेम आहे असे वाटत नाही. बहुसंख्य आंध्रांची तेलंगणा-संबंधी उदासीन (शत्रुत्वाची नसली तरी) वृत्तीच होती. एकंदरीत भाषिक साटे–लोटे फारसे जमले नाही हे खरे ! त्यातूनही राजनैतिक नेत्यांनी जनतेला वस्तु-स्थिती कधीच सांगितली नाही. शुद्ध तर्क विकारवश भावनेखाली नेहमीच तुडविला गेला. राष्ट्रीयत्वाच्या भूमिकेवरून केलेले आव्हानही व्यर्थ सिद्ध झाले; कारण राष्ट्रीयतेची (आपल्या सोईने) कास धरणारे केंद्रीय नेते तेलंगणलाच राष्ट्रीयतेचे बाळकडू का पाजतात ते कळत नाही ! पंजाब, आसामचे तुकडे व लहान लहान गावांनाही स्वतंत्र ठेवणे या धोरणाशी राष्ट्रीयतेचा काय संबंध आहे हे कळत नाही. अशा नेत्यांना केवळ तेलंगणलाच उपदेश करण्याचा काय अधिकार पोचतो, हे कळत नाही.

खरे पाहिले तर राष्ट्रीयता ही जबरदस्तीने लादून होत नाही. भांडणाऱ्या लोकांना केवळ एकत्र डांबून भांडण थांबविता येत नाही. भांडणाच्या मूळ कारणास डावलून केवळ उदात्त तत्त्वांचा घोष करून ऐक्य साधता येत नाही. तेलंगण चळवळीचे मूळ आर्थिक कुचंबणा आहे व ही कुचंबणा पुष्कळशा मागासलेल्या प्रांतात दिसून येते. या आर्थिक असंतोषाचा परिणाम अधिक श्रम व अधिक उत्पादनात व्हावयास पाहिजे होता. पण या कुचंबणेचा फायदा घेऊन एका विशिष्ट गटाने राजकीय बुरखा घेऊन सर्वत्र प्रचलित असलेले आंदोलनाचे धोरण अवलंबिले. शारीरिक दुःख रोग्यास असह्य होत असेल तर त्याला झोपेची गोळी देतात, पण

तो उपाय फारच तात्कालिक असतो. 'आंध्रांनी तेलंगणावर अन्याय केला आहे' ही घोषणा उपयोगी पडली खरी; पण या अन्यायास तेलंगणातील लोक स्वतःच जबाबदार आहेत, याची मात्र सोईस्कर विस्मृति झाली. चिंतनशून्यतेचा व परिश्रमहीनतेचा जो रोग देशास जडला आहे, त्याचे बाह्य निदर्शन म्हणजे तेलंगण आंदोलन हे होय. हा रोग स्वतंत्र तेलंगण झाल्यानंतर बरा होईल, हे म्हणणे म्हणजे आपल्या अज्ञानाचे प्रदर्शन करणे होय!

पण काहीतरी तडजोड ही झालीच पाहिजे. आंध्र, आणि त्याचप्रमाणे इतर उद्योगपतींच्या हितसंबंधांना धक्का न लावता तसेच दोन्ही विभागातील लोकांच्या सांस्कृतिक, पारंपरिक संबंधांना धक्का न लावता तेलंगण व आंध्र असे दोन प्रदेश करण्यास काहीच हरकत नसावी. दोघांचेही संबंध सरकारी नीतीमुळे फाटेपर्यंत तुटले आहेत. त्यांना सांधणे कठिण आहे. भांडखोर भाऊ स्वतंत्र होतात; पण त्यांचे त्यांना वाईट वाटते, काही दिवसांनी हळुहळु परस्परसंबंध येऊ लागतात. (सणावारांच्या निमित्ताने का होईना) व परस्पर मतभेद असले तरी दोघांची प्रगती व्हावयासच पाहिजे, असे तरी मानू लागतात. एकत्र राहून नेहमीच संघर्षरत रहाण्यापेक्षा स्वतंत्र राहून कटकटी टाळणे फारच योग्य आहे. अर्थात हे ठरविणे देखील सोपे नाही – विशेषत: १२ वर्षांच्या एकत्र राजवटीनंतर! शांत डोक्याने विचार व्हावयास हवा आहे. कदाचित् राष्ट्रपतींच्या राजवटीत असा शांत विचार होणे शक्य आहे. पण त्यातही पक्ष किंवा गटहित आडवे येत आहे. प्रस्तुत लेखकास तेलंगण स्वतंत्र झाल्यास त्याच्या प्रतिक्रिया देशात इतरत्र होतील याचे मुळीच भय वाटत नाही; कारण तेलंगणची परिस्थिती निराळी आहे. त्याच्या स्वतंत्र रहाण्यास भाषावार पुनर्रचना आयोगाचा पाठिंबा आहे. तेव्हा आंध्रचे दोन भाग स्वतंत्रपणे पण आनंदाने राहिले तर त्यात फार तर विशिष्ट पक्षाचे नुकसान होईल, पण राष्ट्रीयतेला बाध येईल, असे वाटत नाही!

पण स्वतंत्र तेलंगण झालेच पाहिजे असा आग्रहही सध्याच्या परिस्थितीत धरता येत नाही. 'स्वतंत्र तेलंगण अन्यथा हितावह असताना देखील एका विशिष्ट कारणामुळे ह्या विचाराला काटशह बसत आहे. तेलंगण-आंध्र झगड्याचा फायदा घेऊन अराजक माजविण्यास उद्युक्त झालेल्या नक्षलवाद्यांकडून हा धोका निर्माण झाला आहे. पण हा विषय स्वतंत्र आहे. त्याची चर्चा येथे अप्रस्तुत वाटते.

□ □ □

रशियन राज्यक्रांतीविषयी प्रचारात्मक
साहित्य विपुल आहे. उजेडात आलेल्या
नवीन माहितीच्या आधारे लिहिलेला
मराठीतील हा मात्र एकमेव ग्रंथ आहे.

# व्होल्गा जेव्हा लाल होते

प्रस्तावना : ना. ग. गोरे

लेखक : वि. स. वाळिंबे

मूल्य : अठरा रुपये

राजहंस प्रकाशन : १०२५ सदाशिव पेठ : पुणे ३०

# मयुर

सुरेश द. म्हात्रे

मयुरचा मृत्यू !

एका काचेरी...बिलोरी...निराकार स्वप्नाचा चक्काचूर !

—छे...छे. कुणीतरी कानात आणून ओतलेल्या ह्या वृत्तावर विश्वास ठेवायला मी तयार नव्हतो...पण हे खरे आहे ! मयूरने स्वतःच आपला मृत्यू घडवून आणला...किती विचित्र घटना !

...मयुरला मी निश्चित कधी पाहिले ते मला आता आठवत नाही. पण स्वप्नाळू डोळ्यांचा...स्वप्नीली नशा पिऊन...रंगीली स्वप्नं उरात साठवून... रस्त्यातून आपल्याच झोकात जाणारा हा एककल्ली...कलंदर मयुर...कोण्या एका काळी माझ्या जीवनात आला नि माझाच होऊन गेला ! तो माझा प्यारा दोस्त... माझा प्यारा मयुर असे करील असे मला कधीच वाटले नाही. का वाटावं ? मला त्याची पुसटशी कल्पनाही नव्हती, कारण असे करणारा हा मयुर मला अपरिचित होता !

—या उलट मी ओळखत होतो तो मयुर वेगळाच होता. कितीतरी वेगळा !

त्याच्या एका हस्तलिखिताच्या वहीत त्याने एका ठिकाणी स्वाक्षरीनिशी काही-तरी लिहून ठेवल्याचे मला आठवते.... "रस्त्यातून चालताना मी जरा जपूनच चालतो. कारण मला मरणाचे अतिशय भय वाटते. तो अपघाती वा अकाली होऊ नये ही माझी इच्छा ! मला वाटतं प्रत्येक "ध्येयवादी" माणूस असाच असावा... मयुर."

—किती हृदयंगम विचार !

पण मरणाचे भय बाळगणाऱ्या मयुरनेच मृत्यूला बोलावले...त्याचे स्वागत केले ! आपल्या मनात सजविलेली...फुलविलेली अनेक स्वप्नांची आरास... देहाची एक प्रचंड होळी करून विझवून टाकली, त्याची राख राख केली...आणि एका भयाण...अजाण...पण प्रचंड अशा काळोखात स्वतःला भिरकावून दिले !

...छे—छे ! मयुर ! असं का केलंस तू ? मेरे प्यारे दोस्त, पगले ये तुने क्या किया ?...मेरे यार...क्यू किया ऐसा ?...



-- गेले कित्येक दिवस मी त्याला पाहिले नव्हते.

पण एकदा असाच कुठेसा...बसमधून की ट्रेनमधून चढता उतरताना कुठल्याशा थांब्या-नाक्यावर दिसला होता तो! शी...किती भयंकर चेहरा! छं...चेहरा नव्हताच त्याला! स्वत:चा चेहरा हरवलेला मयुर होता तो!! कुठे स्वप्नील्या दुनियेत रंगणारा, भरकटत रहाणारा मयुर...अन् कुठे एखाद्या दर्याच्या निखळून पडलेल्या दगडासारखा निर्विकार...ताठर झालेला मयुर!...

त्यानंतर मी त्याला भेटून जाण्याविषयीचे पत्र लिहिले....

— पण तो आला नाही. मला त्याच्या गोष्टीविषयी बोलायचे होते. पाठ थोपटायची होती...कडकडून आलिंगन द्यायचे होते... क्वचितप्रसंगी कानात कुजबुजायचे होते....

" ...दोस्त, आता तू मरून जा. खरंच सांगतो मरून जा. बस्स! तुझी ही एकच गोष्ट मराठी साहित्यात अमर होऊन राहील. अन्...साल्या जिवंत रहायचंच असेल, तर असे पुन्हा कधीही लिहू नकोस...बघ दोस्त! तू माझा दोस्त आहेस म्हणून. तुझा शत्रू असतो तर इतकी चांगली गोष्ट – जी माझ्या हृदयात...मनात ...डोक्यात भरून राहिलीय...जिने मला अक्षरश: वेड लावलंय, बेभान केलंय...

ती – वाचून तुझा खूनच केला असता ! सुरा नाहीतर चाकू मारला असता !!
पण दोस्त, तू माझा दोस्त आहेस...मयुर तू 'माझा' आहेस...म्हणूनच साल्या
आता तू मरून जा...!"

—– पण मयुर आला नव्हताच. □

प्रथम माझ्याकडे तो आला तो किती भारलेल्या अवस्थेत ! वेडापिसा होऊन...
हृदयाशी घट्ट मिठी मारणारा....

'अभिनंदन...अभिनंदन रजनीकांत. कादंबरी वाचली...बहोत खूब...या एका
वाचकाचा सादर प्रणाम !'

— पहिल्या भेटीत हा असा काहीबाही बडबडणारा...माझ्या तथाकथित
कादंबरीबद्दल पागल होऊन माझे अभिनंदन करणारा पहिला वाचक म्हणून आलेला...

— दुसऱ्यांदा नि अनेकदा येऊन माझा मित्र-दोस्त झालेला...

— आणि अखेर साहित्यविषयक प्रचंड धबधब्यासारखं बोलून...माझ्याकडून
'लेखक' म्हणून घडलेला...हा विचित्र प्राणीच माझ्या अभिनंदनास पात्र ठरावा
हे जगातले कितवे आश्चर्य ठरावे कुणास ठाऊक !...

पण मी पाहिलं – माणूस रसिक दिसतोय. याच्याही उरात स्वप्नं आहेत...एक
निराकार...धूसर ध्येय आहे. एक लखाकता...चकाकता हिरा एका तेजाच्या
सुप्त वलयाखाली पहुडलेला आहे. तो चमकायला हवा...त्याला आच द्यायला
हवी...घडवायला हवा...

—तोही फुलेल...तोही बहरेल...तोही चमकेल...

आणि मी परिश्रम घेतले. माझे सनिध्य त्यास होऊ घातले. माणुसकीचे अफाट पंख
पसरवले...आपल्या स्वतःच्या सावलीखाली तो फुलू लागला...मला समाधान
वाटले...

आणि–

कोणी काही म्हणोत. मीच त्याला घडवलं...बनवलं...फुलवलं, मयुर लेखक
झाला. त्याची पहिली कथा जेव्हा प्रसिद्ध झाली तेव्हा फुललेल्या मनाने तो मला
अगत्याने भेटायला आला...

"मेरे हमदम–मेरे दोस्त, हे श्रेय तुझे...रजनीकान्त !"

—समाधान. मी घडवला...मी फुलवला याचे मला समाधान. पण हे काय ?
प्रणाम ?...

...मातीतून मूर्ती घडली होती अन् लोक तिची पूजा करू लागले होते...मूर्ति-
काराचे काम संपले होते !...

मयुर भयंकर जोरात होता...जोशात होता. त्याचे जीवनच एक धुंदी...एक
स्वप्न...एक नशा झाली होती. कल्पनेच्या भराऱ्या...स्वप्नाच्या उभाऱ्या...आणि

उंचच उंच तरंगत रहाणं, सतत पोहत वा वहात रहाणं...हेच त्याचं जीवन !

—मयुर रोज येऊ लागला...

—मयुर खूप लिहू लागला...

—मयुर फुलला...बुद्धीचा पिसारा फुलवून ! स्वत:तच रंगला. नंतर मात्र येणं अचानक बंद केले. बरेच दिवस माझ्याकडे येईनासा झाला.

बुद्धीचा पिसारा फुलवून ' साहित्याचिया रानी ' पदन्यास करणारा मयुर आता बुद्धीचा ' पसारा ' मांडून बसला असेल अशी मी समजूत केली.

...त्यानंतर त्याची ती गोष्ट आली. स्पर्धेला पहिली. " हिरवी " ! त्याची स्तुती झाली...मूल्यमापन झाले... ' मयुरच्या साहित्यावर रजनीकांताची छाप आहे.' असे माझ्या गोटातून ऐकायला मिळाले !

—मयुर स्वत: फुलला होता...आता त्याचे साहित्य फुलत होते !...

मी ती कथा घेऊन इकडे तिकडे मिरवली. मला अभिमान वाटला. अन् मी मयुरला भेटण्याविषयीचे पत्र लिहिले. पण तो आला नाही...

—मग मी त्याच्या घरी गेलो. तरीही भेटला नाही. भेटेल पुन्हा अशी कल्पना करून मी परतलो. पण अखेर ती कल्पनाच ठरली.

अन् तो ' तसा ' गेला !

लोक म्हणतात—त्याच्या मनात माझ्याविषयी असूया, द्वेष, मत्सर, घृणा किंवा असेच काहीतरी निर्माण झाले होते. का ? तर म्हणे...आपल्या लेखनाचे श्रेय सर्वस्वी रजनीकांताकडे जातेय !...पण ते श्रेय त्यानेही स्वत:च मला दिले होते. असे असताना त्याच्या मनात माझ्याविषयी क्रोध, मत्सर, द्वेष, असूया, घृणा यापैकी काही निर्माण होणे कसे शक्य आहे ? अन् तसे असलेच तरी त्याच्या अनाकलनीय मृत्यूला मी जबाबदार ठरतो का ?...छे—छे ! मयुर माझा होता. मी फुलवला होता त्याला. तो असं कसं करेल ?...

आणि मी त्याच्या घरी गेलो.

...त्याच्या ' साहित्य—सोनियाच्या खाणी ' उपसू लागलो, मान्यवर—नामवंत लेखकांची पुस्तके मनात पूज्यभाव बाळगूनही कस्पटासारखी फेकू लागलो !

—मयुरने कुठे काही लिहून ठेवलं आहे का ?...त्याच्या मृत्यूला कुणी जबाबदार आहे का ?...मयुर का प्रवृत्त झाला मृत्यूला सामोरा जायला ?...जीवनात ध्येय...कांक्षा...जिद्दीची रोषणाई करण्याची इच्छा उरी बाळगणारा मयुर—त्याने का उडी घेतली मृत्यूच्या भयाण काळोखात ?...का असा होम केला आपल्या उम्या आयुष्याचा ?...का लोटले स्वत:ला मृत्यूच्या खोल दरीत ?...का ?...का ?...प्रश्नचिन्हांकित वर्तुळात मी भरकटत होतो...

सारं उपसून झालं...सारं शोधून झालं...पण मयुर हातचा गेलाच ! हाती आलं ते—तेच हस्तलिखित. की ज्यावर त्याने लिहिले होते.—

" ...मला मरणाचे अतिशय भय वाटते, म्हणून. रस्त्यांतून चालताना मी जरा जपूनच चालतो...मला वाटतं–प्रत्येक 'ध्येयवादी' माणूस असाच असावा..."

—ध्ये...य...वा...दी! छेः! तू कसला ध्येयवादी मयुर?...तू कसला मरणाची भीती बाळगणारा?...जीवनाची भीती बाळगणारा तू! म्हणून तर ध्येयापासून परावृत्त होऊन मरणाच्या माध्यमातून...कुणालाही काहीही न सांगता पळालास ना तू! मरण तुला प्यारं वाटलं...मरण तुला निळं वाटलं...निळ्या आकाशाचं तळं वाटलं...कथेसारखं हिरवं हिरवं...अन् झेपावलास तू राजहंसा! पण एक क्षण चमकून कोसळलास ना दगड होऊन काळोखात!! उ...ल्के...सा...र...खा...?

तुझं काळाचं परिमाण संपलं. आता तिथे कुठली आली 'हिरवी' सृष्टी! तिथे सारा काळोख. काळा–काळा...काळकूट्ट! काळा-काळा काळाकभिन्न!! घनघोर ...दाट...अफाट. सारा अंधारा काळोखच...

—हिरवी सृष्टी...स्वप्नांची वृष्टी इथेच होते मयुर! ही पहा येथे. येथे आहे हिरवी–हिरवी हिरवळ. तुझी कथेतली हिरवी सृष्टी...

हिरवा. हि...र...वी...!

मी हस्तलिखित बाजूला केलं...अन् उपसलेल्या पुस्तकांत 'हिरवी' शोधू लागलो. मयुरची स्पर्धेतील माझ्या दृष्टीतली अमर कथा...!

'हिरवी' मी काखोटीला मारली...अन् विचारांच्या वाऱ्यावर स्वार होऊन... झेपावत...झिंगत मी घरी परतलो.

कथचे पान उलगडले. त्यावर 'प्रिय रजनीकांत यांस...' एवढीच अक्षरे मला दिसली. याशिवाय माझ्या संबंधीचा कसलाही उल्लेख मला आढळला नाही.

—मी कथा वाचायला सुरुवात केली अन्...माझ्या मनाचा गाभारा गद्‌गदू लागला...कोणीतरी आतून हर्षभराने किंचाळत होते...

"...दोस्त, आता तू मरून जा. खरंच सांगतो मरून जा! तुझी ही एकच गोष्ट मराठी साहित्यात अमर होऊन जाईल. अन्...साल्या, जिवंत रहायचंच असेल...तर असे पुन्हा कधीही लिहू नकोस! बघ दोस्त...तू माझा दोस्त आहेस म्हणून...नाहीतर इतकी चांगली गोष्ट–जी माझ्या हृदयात–मनात–डोक्यांत भरून राहिलीय... जिने मला वेड लावलंय, ती वाचून मी तुझा खूनच केला असता! पण दोस्त, तू माझा दोस्त आहेस...मयुर तू 'माझा' आहेस. म्हणून..."

—अन् माझ्या डोळ्यातून अश्रु ठिबकू लागले...माझं हृदय ठसठसू लागलं... हृदयात वेदनेचे शिल्प कोरले जाऊ लागले...मनाच्या पाटीवर एका शब्दाचे गीत मी लिहिले...आणि...दुःखाचे स्वर झंकारलेच!

"म...युऽऽऽर...!"

—मयुरला माझे विचार कळले होते का?... ◻ ◻ ◻


फॉस्फोमिन -
अधिक उत्साह देते.
भूक वाढविते. जोम
वृद्धिंगत करते.
शरीराची रोग-
प्रतिकार-क्षमता
वाढविते.
खरोखर!...
फॉस्फोमिन म्हणजे
घरकुलांतील
आरोग्याचे कारंजे!
SQUIBB
Phosfomin
MULTIPLE
GLYCEROPHOSPHATES
B COMPLEX
VITAMINS ELIXIR
240 mL
SARABHAI CHEMICALS
व्हिटॅमिन बी कॉम्प्लेक्स आणि विविध ग्लिसरोफॉस्फेटस्युक्त उत्तम
फलास्वाद असलेले हिरव्या रंगाचें टॉनिक—फॉस्फोमिन
SQUIBB
® हा ई. आर. स्क्विब ॲण्ड सन्स इन्कॉर्पोरेटेड यांचा रजिस्टर्ड ट्रेडमार्क आहे व करमचन्द प्रेमचन्द प्रायवेट लि. यांना तो वापरण्याचे लायसन्स आहे
SARABHAI CHEMICALS
Shilpi SC 50 A/67 Mar



# बादशहाखान

सरहद्द गांधी खान अब्दुल गफारखान १ ऑक्टोबरला भारतात आले आहेत. महात्मा गांधी जन्मशताब्दि समारंभात भाग घेणे आणि पंडित नेहरू आंतरराष्ट्रीय सलोखा पारितोषिक स्वीकारणे हे त्यांचे मुख्य कार्यक्रम असले तरी पख्तुनिस्तानच्या न्याय्य लढ्याला भारताने पाठिंबा द्यावा अशी त्यांची रास्त अपेक्षा आहे. फाळणीच्यावेळी पठाणांवर अन्याय झाला, कॉंग्रेस नेत्यांनी आपला विश्वासघात केला ही त्यांची मनोव्यथा आहे. स्वातंत्र्यलढ्यातील बादशहाखानांच्या कार्याचा गौरव करणारी भाषणे करून किंवा नेहरू पारितोषिकासारखी पारितोषिके देऊन त्यांचे खरे समाधान होणार नाही. पख्तूनिस्तान किंवा पठाणिस्तानचे ध्येय साध्य करण्यासाठी भारत आपणास काय मदत देऊ शकतो यावरच ते भारतीय नेत्यांना त्यांच्याविषयी वाटणाऱ्या भावनांची खरी पारख करतील. भारतीय नेते या कसोटीस उतरणार काय हा खरा प्रश्न आहे.

देशाभिमान, दलितांबद्दल सहानुभूती व खरी धार्मिक प्रवृत्ती गफारखानांच्या घराण्यातच चालत आलेली आहे. त्यांचे पणजोबा ओबेदुल्लाखान पठाणांचे लोकप्रिय व वचनदार नेते होते. त्यांनी केलेली जागृती व त्यांच्या देशभक्तीबद्दल त्या वेळच्या दुराणी राजकर्त्यांनी त्यांना फाशी दिले होते. ब्रिटिश व टोळीवाल्यातील चकमकीत टोळीवाल्यांना आपल्या वर्चस्वाखाली आणण्याचा प्रयत्न ब्रिटिश करीत तेव्हा गफारखानांचे आजोबा सैफुल्लाखान नेहमी टोळीवाल्यांच्या बाजूस उभे रहात. वडील बेहरामखान हस्तनगरचे मुख्य खान व बडे जमीनदार होते. पण जमीनदारीचा

# पठाणांचा झुंझार नेता

— वा. वा. रानडे

ताठा त्यांच्यात नव्हता. नम्रता, संयम, विश्वास, सत्यनिष्ठा हे गुण वडिलांकडूनच गफारखानांमध्ये आले. बेहरामखान कधी खोटे बोलत नसत. त्यांचा शब्द म्हणजे सत्य. त्याबद्दल शंका घेण्यास कोणी धजत नसे. गरीब पठाणांचा त्यांच्यावर एवढा विश्वास असे की आपल्याजवळची सर्व शिलकी पुंजी ते निःशंकपणे त्यांच्याजवळ ठेवीत. अधिकाऱ्यांच्या तालावर ते कधी नाचत नसत; पण आपल्याबद्दल दरारा त्यांनी निर्माण केला होता.

हस्तनगर ही गफारखानांची जन्मभूमी. पेशावर जिल्ह्याच्या चारसद्दा तहशील-मध्ये हे गाव आहे. मुहमदझाई ही तेथे स्थायिक झालेली पठाणजमात. त्यांची पख्तू भाषा अत्यंत शुद्ध म्हणून प्रसिद्ध आहे. गांधारांची राजधानी पूर्वी याच भागात होती. आपल्या भूमीने, आर्य, बौद्ध, इस्लाम अशा अनेक संस्कृती पाहिल्याबद्दल गफारखानांना अभिमान वाटतो.

बेहरामखान स्वतः काही शिकलेले नव्हते; पण त्यांना शिक्षणाबद्दल आदर होता. मुल्लांच्या विरोधास न जुमानता आपल्या मुलांना त्यांनी शिक्षण दिले. गफारखानांचे वडील बंधू खानसाहेब हा शाळेत पाठविलेला त्यांच्या गावचा पहिला मुलगा होता. गफारखानांनी मशिदीतील शाळेत कुराणाचे पाठ पुरे केल्यावर त्यांनाही पेशावरच्या म्युनिसिपल बोर्ड हायस्कूलमध्ये पाठविले. प्राथमिक शिक्षण तेथे घेतल्यावर ते एडवर्डस् मेमोरिअल मिशन हायस्कूलमध्ये गेले. त्यांचा नोकर बरानी काका त्यांच्या वर्गातच होता. लष्करी नोकरीतील मानमरातबाबद्दल तो नेहमी बोले. पगारा

खानांनाही लष्करी नोकरीचे आकर्षण वाटू लागले. वडिलांची संमती न घेताच त्यांनी सरसेनानीकडे कमिशनसाठी अर्ज पाठविला. सव्वासहा फूट उंचीच्या या धिप्पाड मुलाची सहज निवड झाली. वडिलांना हे समजताच फार आनंद झाला.

## जीवनास कलाटणी देणारा प्रसंग

गफारखान लष्करात वरच्या पदावर चढत मोठे अधिकारी झाले असते; पण एका प्रसंगाने त्यांच्या आयुष्याला कलाटणी मिळाली. पेशावरमध्ये एकदा घोडदळात अधिकारी असलेल्या एका मित्राला भेटण्यास ते गेले. मित्राने पाश्चात्य पद्धतीप्रमाणे केस कापले होते. ते पाहून एका सामान्य गोऱ्या अधिकाऱ्यास राग आला. तो तुच्छतेने म्हणाला, "काय सरदार साहेब, तुम्हीही इंग्रजी साहेब बनू पाहता काय ?" सरदार साहेबाचा चेहरा पडला. गोऱ्या साहेबास चोख प्रत्युत्तर देण्याचे धैर्य त्याला झाले नाही. गफारखानांना ही गोष्ट फार लागली व त्यांनी त्याच क्षणी ठरविले की लष्करात जायचे नाही व ब्रिटिशांची चाकरी करायची नाही.

त्यानंतर कॅम्पबेलपूर कादियन, अलिगड येथे गफारखानांनी शिक्षण घेतले. त्यांचे वडील बंधू खानसाहेब यावेळी इंग्लंडमध्ये वैद्यकीय शिक्षण घेत होते. त्यांचे वडिलांना पत्र आले की गफारलाही इंग्लंडला पाठवा. तो चांगला एंजिनिअर होईल. वडिलांनी त्याप्रमाणे गफारखानांना इंग्लंडला पाठवायचे ठरविले. पूर्व तयारीसाठी त्यांना ३००० रु.ही दिले; पण आईने संमती न दिल्याने तो बेत रद्द झाला. विलायतेला पाठविलेला माणूस परत येत नाही अशी गावातील लोकांची भोळी समजूत होती. तुमचा एक मुलगा गेला आता दुसराही गेला तर तुम्हाला कोणी राहणार नाही असे गफारखानांच्या आईस सांगण्यात आले व त्यामुळे तिने विरोध केला. आईस दुखविणे गफारखानांना योग्य वाटेना.

यानंतर गफारखानांनी सीमा प्रांतात शिक्षण प्रसाराचे कार्य हाती घेतले. त्यासाठी 'दार-उल उलूम' संस्था त्यांनी स्थापन केली. उतमंझाई येथे १९१० साली त्यांनी एक शाळा सुरू केली व काही वर्षात सबंध सीमा प्रांतात शाळांचे जाळे उभारले. अलिगड विद्यापीठ म्हणजे मुस्लीम जातीयवाद्यांचे केंद्र झाले होते. मुस्लीम समाजाला जातीयवादापासून बाजूला काढून त्यांच्यात राष्ट्रवाद बाणविण्याचे उद्देशाने देवबंड हे दुसरे शिक्षणपीठ राष्ट्रीय वृत्तीच्या मुस्लीम नेत्यांनी स्थापन केले होते. सरकारने या संस्थेत गुप्तहेर पेरले होते. गफारखान गुप्तपणे देवबंडला भेट देऊन कार्यकर्त्यांशी चर्चा करीत. मौलाना आझादांचे संपादनाखाली निघणाऱ्या 'अल हिलाल' साप्ताहिकाचे ते नियमित ग्राहक होते. राष्ट्रवादाच्या प्रचारामुळे हे पत्र सरकारच्या काळ्या यादीत होते.

सीमा प्रांतात टोळीवाल्यांच्या प्रदेशात स्वातंत्र्य-लढ्याचे केंद्र स्थापन करावे असे देवबंड येथे १९१२ साली काही मौलवींच्या बैठकीत ठरले. सरहद्द गांधी या

बैठकीस उपस्थित होते. त्यासाठी बजौट भागात सुरक्षित जागा निवडण्याची कामगिरी गफारखान व मौलवी फाझल महमद यांच्यावर टाकण्यात आली. त्यांनी बजौट भागातील जवळजवळ प्रत्येक खेड्यास भेट देऊन मोमंद टोळ्यांचे प्रदेशातील झगाई या खेड्याची निवड केली.

गफारखानांचा पहिला विवाह १९१२ साली झाला. घनी व वली हे दोन मुलगे झाले. घनी १९१५ साली इन्फ्ल्युएंझाने आजारी पडला. त्याची शुद्ध गेली. 'मुलाचा आजार मला दे व त्याला वाचव.' अशी आईने अल्लाची प्रार्थना केली. दुसऱ्या दिवसापासून मुलगा सुधारू लागला पण आई वारली. ती त्यावेळी २५ वर्षांची होती.

## थोड्या सत्तेनेच भ्रष्टाचार

"सविनय कायदेभंग म्हणजे केवळ तुरुंगभरती नव्हे. जे तुरुंगात जातात त्यांना त्याचे महत्त्व समजत नाही. ज्या उद्दिष्टासाठी आपण झगडत आहोत त्या उद्दिष्टास आपण पात्र आहोत काय याची मला शंका आहे. आपल्या हाती थोडीशी सत्ता आली; पण तिने ज्यांना आपण देवदूत समजत होतो त्यांचे खरे रंग दाखवून दिले. थोडी सत्ता हाती येताच मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार दिसावा याचे मला आश्चर्य वाटते. स्वातंत्र्यास पात्र अशा व्यक्ती आपण जोपर्यंत प्रथम निर्माण करीत नाही तोपर्यंत सविनय कायदेभंग धोक्याचा आहे."

रामगड कॉंग्रेस अधिवेशनात सरहद्द गांधींनी दिलेला हा इशारा आज कितीतरी पटींनी खरा ठरला आहे.

दुःखाचा हा आघात सोसून गफारखानांनी समाजाच्या सेवेस वाहून घेतले. पठाणांना संघटित करावयाचे, शिक्षण द्यावयाचे, त्यांच्यात सुधारणा करावयाची या व्यापात ते गढून गेले. हस्तनगर येथे एका मशीदीत भरलेल्या सभेत पठाणांनी त्यांना बादशहा पदवी दिली. तेव्हापासून ते बादशहाखान म्हणून ओळखले जाऊ लागले. हा बादशहा वंशपरंपरा गादीवर आलेला नव्हता. पठाण जनतेने उत्स्फूर्तपणे पदवी दिलेला तो जनतेचा बादशहा होता.

रौलट कायदा विरोधी आंदोलनात गफारखानांना अटक झाली. सहा महिन्यानंतर त्यांची मुक्तता झाली. खिलाफत चळवळीतूनच 'हिजरात' चळवळ निघाली. हिजरात म्हणजे देशांतर. अनेक हिंदी मुसलमानांनी खलीफासंबंधीच्या ब्रिटिश धोरणाचे निषेधार्थ अफगाणिस्तानला जायचे ठरविले. ऑगस्ट १९२० मध्ये अठरा हजार पठाण आपली घरे, दुकाने, शेते विकून काबूलला गेले. गफारखानांचे नेतृत्वाखाली एक मोठा जथा गेला.

गफारखानांनी राजे अमानुल्लांची भेट घेतली. अमानुल्लांना इतर अनेक भाषा येत होत्या पण पुश्तू येत नव्हती. पुश्तू तुमची मातृभाषा व राष्ट्रभाषा आहे. ती

तुम्हाला यायला हवी असे गफारखानांनी सांगितल्यावर राजे अमानुल्ला व इतर मंत्रीही पुश्तू शिकले.

स्वतःच्या देशातून पळून जाऊन दुसऱ्या देशात आसरा घेणे निरर्थक आहे ही गोष्ट राजे अमानुल्लांनी गफारखान व त्यांच्या अनुयायांना पटवून दिली. देशांतर केलेले हे लोक काही महिन्यांनी निराश होऊन परतले. गफारखानांनी शिक्षण-कार्य पुनः सुरू केले. ब्रिटिशांनी पहिल्या महायुद्धाच्या काळात बंद केलेल्या शाळा त्यांनी पुनः सुरु करण्याचा प्रयत्न केला.

गफारखानांनी १९२१ साली उत्तमझाई येथे आझाद हायस्कूल स्थापन केले. शिक्षणकार्य पद्धतशीरपणे करण्यासाठी 'अंजुमान इस्लाह्-उल-अफगानिया' ही संस्था त्यांनी स्थापन केली. बंद पडलेल्या शाळा पुनः सुरु करण्यासाठी त्यांनी दौरा काढला. ब्रिटिशांना हे सहन होणे शक्य नव्हते. त्यांनी १९२१ मध्ये गफार-खानांना अटक करून तीन वर्षे सक्तमजुरीची शिक्षा केली. तुरुंगात त्यांचे फार हाल झाले. डेरा इस्माइलखान तुरुंगात खराब अन्नामुळे ते आजारी पडून त्यांचे ५५ पौंड वजन घटले.

तुरुंगात त्यांनी गीता, ग्रंथसाहेब व बायबलचा अभ्यास केला. "गीता त्यावेळी मला फारशी आकलन झाली नाही. कदाचित माझी त्यावेळी तेवढी बौद्धिक तयारी नसेल; पण पुढे १९३० साली पंडित जगतराम यांनी मला गीता चांगली शिकविली." असे गफारखानांनी म्हटले आहे.

गफारखानांचे वडील बंधू डॉ. खानसाहेब यांचे वैद्यकीय शिक्षण इंग्लंडमध्ये पुरे झाल्यावर इंडियन मेडिकल सर्व्हिसमध्ये त्यांना कमिशन मिळाले. भारतात मार्च १९२० मध्ये परतल्यावर गाईडस रेजिमेंटमध्ये कॅप्टन म्हणून त्यांची नेमणूक झाली. वझिरिस्तानात वझिरी टोळ्यांविरुद्ध मोहिमेचा हुकूम १९२१ मध्ये त्यांच्या पथकास देण्यात आला. आपल्याच बांधवांवर गोळीबार करण्याचे त्यांनी नाकारले व राजिनामा दिला.

गफारखानांचे वडील बेहरामखान १९२६ साली वारले. आपणास आता मोठी भिक्षा मिळेल या अपेक्षेने अनेक मुल्लांनी अंत्ययात्रेस गर्दी केली. पण भिक्षा किंवा दान वाटण्यात आले नाही. तेव्हा गफारखानांची वागणूक योग्य नाही, वडिलांबद्दल त्यांनी योग्य प्रकारे आदर दर्शविला नाही अशी टीका मुल्लांनी दफनविधीचे वेळी केली. वास्तविक गफारखानांसारखीच प्रथा इतरांनी पाडली तर आपले हे विना-सायास मिळणारे भिक्षेचे किंवा दानाचे उत्पन्न बुडेल ही खरी भीति मुल्लांना वाटत होती. त्यावेळी तेथे जमलेल्या लोकांपुढे केलेल्या भाषणात गफारखान म्हणाले, "आता काळ बदलला असुन आपणही बदलले पाहिजे. पूर्वी मुल्ला धार्मिक शिक्षण मोफत देत, पण आता त्यांना त्याबद्दल मोबदला मिळतो. तेव्हा पूर्वीची भिक्षादानाची

रूढी बदलली पाहिजे. भिक्षा देण्यास माझा विरोध नाही. दिवंगत वडिलांच्या स्मरणार्थ मला दोन हजार रुपये द्यावयाचे आहेत. त्यांचा गूळ व साबण खरेदी करून तुमच्यात वाटू की पख्तून मुलांच्या शिक्षणासाठी एखाद्या शाळेस देणगी म्हणून ही रक्कम देऊ ?

"शाळेला देणगी द्या." श्रोते ओरडले.

मुल्लांच्या विरोधाला न जुमानता गफारखानांनी याप्रमाणे जुन्या रूढींमध्ये सुधारणा घडवून आणल्या.



### पैगंबराची खरी शिकवण

गफारखान, मोठी बहीण व पत्नीबरोबर हाज यात्रेस गेले त्यावेळचा एक प्रसंग. यात्रा आटोपून ते तैफ येथे पत्नीसह एका मित्राच्या घरी काही दिवस विश्रांतीसाठी गेले. एक दिवस ते शहराबाहेर फिरायला गेले असता पायघोळ झगा घातलेला एक अनोळखी दाढीवाला त्यांना भेटला. गफारखानांना जवळ बोलावून तो म्हणाला, "हजरत पैगंबरांचा केस व पावलाचा ठसा येथील दगडावर आहे."

गफारखान म्हणाले, "मी या गोष्टीसाठी येथे आलेलो नाही. हजरत पैगंबरांची सहनशीलता व धैर्य यांचे स्मरण करण्यासाठी मी आलो आहे. हजरत पैगंबर मक्केहून ७५ मैल दूर असलेल्या तैफ येथे तेथील लोकांचे कल्याण करण्यासाठी आले होते; पण लोकांनी त्यांच्यावर दगडफेक केली. कुत्र्यांनी त्यांचा पाठलाग केला. लोकांनी त्यांना मारहाणही केली. तरीही लोककल्याणाच्या आपल्या मार्गापासून विचलित न होता पैगंबरांनी प्रार्थना केली, "अल्ला, माझ्या लोकांना योग्य मार्ग दाखव."

बाह्य धार्मिक उपचार व रूढींना महत्त्व न देता पैगंबरांची खरी शिकवण गफार-

खानानी आचरणात आणली व आपले सारे आयुष्य लोककल्याणासाठी वेचले.

गफारखान मदिनेहून जरुसलेमला गेले. तेथे त्यांची पत्नी जिन्यावरून पडून मरण पावली. गफारखानांची ही दुसरी पत्नी. पहिल्या पत्नीसारखीच तीही अकाली गेली. गफारखानांवर हा मोठाच आघात होता. यानंतर त्यांनी विवाह केला नाही.

हाज यात्रेहून परतताना पॅलेस्टाइन, लेबानन, सीरिया व इराक या देशांना गफारखानांनी भेट दिली. या देशातून पॅन-इस्लामिझमची जागा राष्ट्रवादाने घेतली असल्याचे त्यांना आढळून आले. राष्ट्रवादावरची त्यांची श्रद्धा त्यामुळे अधिकच दृढ झाली.

देशात १९२४ ते १९२९ या काळात जातीय दंगलींनी वातावरण दूषित झाले होते. गफारखानांनी संकुचित जातीय विचारांचा स्पर्शही आपल्या मनास कधी होऊ दिला नाही. इस्लामची खरी शिकवण विशद करताना एकदा ते म्हणाले, " इस्लाम म्हणजे अमल, यकीन व मुहब्बत (सदाचार, श्रद्धा आणि प्रेम).

सीमा प्रांतातील पठाणांना मुस्लीम लीगच्या ब्रिटिश-धार्जिण्या, संकुचित, जातीयवादी राजकारणापासून दूर ठेवून त्यांच्यात राष्ट्रवादाची ज्योत सतत तेवत ठेवण्याचे आणि स्वातंत्र्य चळवळीत त्यांना सामील करून घेण्याचें फार मोठे कार्य बादशहाखानांनी केले. अठ्ठ्याण्णव टक्के पठाण निरक्षर होते. खेडोपाडी पायी दौरे काढून, भाषणे करून सामाजिक व राजकीय सुधारणांचा संदेश गफारखानांनी त्यांच्यापर्यंत पोचविला. पठाणांना आपल्या भाषेबद्दल प्रेम नव्हते. ते त्यांनी त्यांच्यात निर्माण केले. आपल्या कार्याला सर्व सुशिक्षित पठाणांचा पाठिंबा मिळविण्यासाठी पख्तू भाषेत 'पख्तून' हे मासिक गफारखानांनी आपल्या संपादनाखाली मे १९२८ मध्ये सुरू केले. थोड्याच अवधीत ते लोकप्रिय झाले. केवळ सीमा प्रांतातीलच नव्हे तर जगाच्या कोणत्याही भागात राहणारे पठाण हे मासिक आवडीने वाचीत. अमेरिकेतील पठाणांनी या मासिकास मोठ्या प्रमाणावर आर्थिक मदत केली. पख्तू भाषेतील हे पहिलेच राजकीय मासिक होते. वार्षिक वर्गणी चार रुपये होती. विद्यार्थ्यांना ते अडीच रुपये सवलतीच्या वर्गणीत मिळे. एप्रिल १९३० मध्ये गफारखानांना अटक झाल्यावर 'पख्तून'ला बंदी करण्यात आली. गफारखानांची मुक्तता झाल्यावर ते पुन: सुरू झाले व १९३१ मध्ये अटक झाल्यावर त्यास पुन: बंदी करण्यात आली. गफारखानांना अनेक वर्षे सीमा प्रांतात प्रवेश करण्यास बंदी होती. १९३७ साली ही बंदी उठल्यावर हे पत्र त्यांनी पुन: सुरू केले. मधला एक वर्षाचा खंड सोडल्यास ऑक्टोबर १९४२ मध्ये गफारखानांना अटक होईपर्यंत हे पत्र चालू होते. १९४५ मध्ये मुक्तता झाल्यावर त्यांनी ते पुन: सुरू केले. ऑगस्ट १९४७ मध्ये पाक सरकारने कायमची बंदी करीपर्यंत ते चालू होते. पाक सरकारने या पत्राच्या सर्व उपलब्ध प्रती नष्ट केल्या,

## खुदाई खिदमतगार संघटना

पठाणांमधील सामाजिक उणीवा दूर करण्यासाठी गफारखानांनी 'खुदाई खिदमतगार' ही स्वयंसेवक संघटना काढली. खुदाई खिदमतगार म्हणजे ईश्वराचे सेवक. खुदाई खिदमतगारास पुढील शपथ घ्यावी लागे.

"मी खुदाई खिदमतगार आहे. देवाला सेवेची जरूर नसल्याने मी प्राणिमात्रांची निःस्वार्थ सेवा करून त्याची सेवा करीन. हिंसेचा मी कधीही अवलंब करणार नाही. मी सूड किंवा बदला घेणार नाही. माझ्यावर जुलूम व अत्याचार करणारास मी क्षमा करीन. कट-कारस्थाने, कुटुंबातील भांडणे वगैरे यात मी सहभागी होणार नाही. प्रत्येक पख्तूनास मी माझा बंधू व मित्र मानीन. वाईट प्रथा व चालीरीती मी सोडून देईन. मी साधे जीवन जगेन. चांगल्या गोष्टी करीन व वाईट गोष्टी करण्याचे टाळीन. मी चांगले चारित्र्य व सवयी अंगी बाणवीन. आयुष्य आळसात घालविणार नही. केलेल्या सेवेबद्दल बक्षिसाची अपेक्षा मी करणार नाही. मी निर्भय राहीन व कोणत्याही त्यागास नेहमी तयार राहीन."

कोणत्याही स्वयंसेवक संघटनेस आदर्श वाटावी अशीच ही शपथ आहे.

लाल डगला हा खुदाई खिदमतगारांचा गणवेश होता. त्यावरून 'लाल डगलेवाले' या नावानेही ही संघटना ओळखली जाऊ लागली. सप्टेंबर १९३० पर्यंत या संघटनेच्या स्वयंसेवकांची संख्या ८० हजारावर गेली होती.

पठाणांची ही संघटना मोडून काढण्यासाठी ब्रिटिशांनी अमानुष दडपशाही केली. दडपशाहीची चौकशी करण्यासाठी काँग्रेसने वल्लभभाई पटेल समिती नेमली होती. गफारखानांच्या उतमंझाई खेड्यात काय घडले त्याचा तिने दिलेला वृत्तांत अंगावर शहारे आणणारा आहे. तेरा मे १९३० ला पहाटे तीन वाजता अंधार असतानाच सैनिकांनी खेड्याला वेढा दिला. दिवस उजाडताच डेप्युटी कमिशनर ब्रिटिश व हिंदी सैनिकांसह खेड्यात शिरले. खेड्याबाहेर ब्रिटिश घोडदलाचे ८०० सैनिक आणि शीख, मुस्लीम व डोग्रा सैनिक असलेली एक हिंदी घोडदल रेजिमेंट ठेवली होती. याशिवाय तीनशे शिया सैनिक होते. डेप्युटी कमिशनर खुदाई खिदमतगारांच्या कचेरीजवळ गेले. त्यांनी ब्रिटिश व शिया सैनिकांना कचेरीचे दार फोडून आत प्रवेश करण्याचा हुकूम दिला; पण दार उघडेना तेव्हा भिंतीवरून चढून जाऊन त्यांनी बाल्कनीस वेढा दिला व खाली असलेले सैनिक दार फोडू लागले.

खुदाई खिदमतगार कचेरीत काम करीत होते. 'खाली जा, तुमचे लाल डगले काढा' असा हुकूम डेप्युटी कमिशनरांनी दिला. 'आमच्या अधिकाऱ्याने हुकूम दिल्याशिवाय आम्ही खाली जाणार नाही व मरण पत्करू पण आमचा गणवेश काढणार नाही.' असे बाणेदार उत्तर त्या स्वयंसेवकांनी दिले. डेप्युटी कमिशनरांनी एका खुदाई खिदमतगाराच्या छातीवर खंजीर रोखून त्याला कपडे काढण्याचा हुकूम केला. तो म्हणाला, "साहेब, मी जिवंत असेपर्यंत ते अशक्य आहे." डेप्युटी

कमिशनर व दोन ब्रिटिश सैनिकांनी त्याला बेशुद्ध पडेपर्यंत मारहाण केली व बेशुद्ध स्थितीत त्याचे कपडे फाडून त्याला नग्न केले. याप्रमाणे प्रत्येक खुदाई खिदमतगाराला निर्दय मारहाण करून त्याचे कपडे फाडण्यात आले. अब्दुल रझाक व अनेक खुदाई खिदमतगारांना बाल्कनीतून खाली रस्त्यावर फेकले. अब्दुल रझाकचा एक पाय मोडला. इतरांनाही गंभीर जखमा झाल्या. खुदाई खिदमतगारांचा कॅप्टन महमद नकीबखान याला बेदम मारहाण करून जबरदस्तीने त्याचा शर्ट काढला व विजार काढायला सांगताच त्याला ते असह्य होऊन तो रिव्हॉल्व्हर आणण्यासाठी घरी धावला. तेव्हा खुदाई खिदमतगारांचा प्रमुख त्यास म्हणाला, "तुझी सहनशीलता एवढ्यातच संपली का? आमरण हिंसा न करण्याची शपथ तू घेतली आहेस." त्याने रिव्हॉल्व्हर आणले नाही. त्याला अटक झाली.

ही मारहाण चालू असता गफारखानांचा चौदा वर्षाचा मुलगा गणवेशात तेथे उभा होता 'तू कोण?' डेप्युटी कमिशनरांनी विचारले. "मी खान अब्दुल गफारखानांचा मुलगा." त्याने उत्तर दिले. डेप्युटी कमिशनरांनी त्यास शिवीगाळ केली. एका ब्रिटिश सैनिकाने त्याच्यावर संगीन रोखली; पण एका मुस्लीम सैनिकाने

## दोन परिषदा, दोन नेते

कलकत्त्यास डिसेंबर १९२८ मध्ये भरलेल्या खिलाफत परिषदेला गफारखान काही सहकाऱ्यांसह उपस्थित होते. अली बंधू व पंजाबी नेत्यात मोठी फूट पडली होती. रात्रीच्या एका बैठकीत व्यासपीठावर गफारखानांचे शेजारीच मौलाना महमद अली बसले होते. एका पंजाबी नेत्याने मौलाना महमद अलींवर कडक टीका केली. महमद अलींना ते सहन झाले नाही. त्यांचा पारा चढला. त्यांनी त्या पंजाबी नेत्यास शिवीगाळ केली. याचवेळी व्यासपीठावर बसलेला दुसरा एक पंजाबी नेता उठला व त्याने महमद अलींना शिवीगाळ करून सुरा परजला. गफारखानांच्या सहकाऱ्यांनी मध्ये पडून महमद अलींना वाचविले.

याचवेळी कलकत्त्यात काँग्रेस अधिवेशन चालू होते. गफारखान या अधिवेशनास उपस्थित राहिले. तेव्हा त्याना एक नवाच अनुभव आला. विषयनियामक समितीत गांधीजी भाषण करीत होते. एक जहाल तरुण त्यांच्या भाषणात सारखे अडथळे आणीत होता. गांधीजींनी तोल सोडला नाही. उलट हसून आपले भाषण पुढे चालू ठेवले. गफारखानांवर त्याचा प्रभाव पडला. आपल्या सहकाऱ्यांना त्यांनी हा अनुभव सांगितला. महमद अलींच्या ही गोष्ट निदर्शनास आणली; पण त्यांनी ती उडवून लावली. खिलाफत परिषदेस गफारखान यानंतर कधी गेले नाहीत.

त्याला उचलून खाली उडी टाकली व जवळच्या एका मशीदीत नेऊन त्यास वाचविले.

## एका खानाचे शौर्य

सैनिकांनी खुदाई खिदमतगारांचे कचेरीस आग लावली. गाव उद्ध्वस्त केले. लोकांना ते नैसर्गिक विधीसाठीसुद्धा जाऊ देईनात. गुरे चारू देईनात. सर्व लाल डगलेवाल्यांना अटक करून त्यांनी त्यांना बेदम मारहाण केली. 'आणखी कोणी लाल डगलेवाला आहे?' डेप्युटी कमिशनर गरजला. गावातील एक खान महमद अब्बास खान जवळच उभे होते. त्यांना या उद्गाराची चीड आली. ते घरी गेले. पाण्याच्या भांड्यात त्यांनी लाल पावडर टाकली. त्यात आपले व आपल्या नोकरांचे कपडे बुडविले व तसेच ओले कपडे अंगावर घालून ते डेप्युटी कमिशनरकडे हजर झाले व त्यास म्हणाले, "हे आम्ही लाल डगलेवाले उभे आहोत." महम्मद अब्बास खान तोपर्यंत खुदाई खिदमतगार नव्हते; पण त्याक्षणी त्यांच्यात वीरश्री संचारली व ते खुदाई खिदमतगार झाले. त्यांच्या या शौर्याने लोकात एवढा उत्साह निर्माण झाला की कितीही दडपशाही केली तरी लाल डगला ब्रिटिशांना नष्ट करता आला नाही.

गफारखानांनी स्त्रियांमध्येही स्वाभिमान जागृत केला. 'मी खुदही खिदमतगार

### तुम्ही मेंढरे नाहीत, वाघ आहात

"एका गाभण वाघिणीने मेंढ्यांच्या एका कळपावर झडप घातल्यानंतर ती व्याली व एका पिलाला जन्म देऊन मरण पावली. वाघाचे हे बछडे मेंढ्यांच्या कळपातच वाढले व त्यांच्यासारखेच वागू लागले. एकदा एका वाघाने त्या कळपावर हल्ला केला तेव्हा मेंढ्यांच्या कळपात वाघाचे पिल्लू मेंढ्यांप्रमाणेच बेंबें करताना पाहून त्याला आश्चर्य वाटले. त्याने पिलास बाजूला काढले, तळ्यावर नेले. स्वतःचे प्रतिबिंब पाहताच आपण मेंढी नसून वाघ आहोत याची जाणीव त्या पिलास झाली. वाघ त्याला म्हणाला, "तू मेंढी नसून वाघ आहेस. बें बें काय करतोस? वाघाप्रमाणे डरकाळी फोड."

"तुम्ही पठाणसुद्धा मेंढ्या नसून वाघ आहात. गुलामगिरीत वाढल्याने तुम्हाला आपण मेंढरेच आहोत असे वाटू लागले आहे. बें बें करू नका, वाघासारख्या डरकाळ्या फोडा."

गफारखानांनी स्वतःच स्थापन केलेल्या आझाद हायस्कूलच्या एका संमेलनात हे आवेशपूर्ण भाषण केले. अशी भाषणे करीत प्रांतभर दौरा काढून त्यांनी पठाणांमध्ये जागृती केली.

नाही' अशा कबुली जबाबावर पठाणांच्या अंगठ्याचे ठसे घेण्याची मोहीम ब्रिटिश अधिकाऱ्यांनी सुरू केली होती. अनेकांनी ठसे द्यायचे नाकारले; पण एका पठाणाने ठसा दिला. तो घरी आला तेव्हा त्याची पत्नी कपडे धूत होती. तिने विचारले, 'तुम्ही घरी कसे आला ?' तो म्हणाला, 'मला सोडले.' त्यावर ती म्हणाली, 'इतरांना सोडले नाही आणि तुम्हालाच कसे सोडले ? पाहू तुमचा अंगठा. तुम्ही अंगठ्याचा ठसा दिला असला पाहिजे.' धुपाटणे घेऊन तिने नवऱ्याचा पाठलाग केला तेव्हा तो परत आपल्या सहकाऱ्यांना जाऊन मिळाला. त्यांनी चौकशी करताच तो म्हणाला. "पत्नी मला घरात घेईना."

गफारखानांना १९३२ साली अटक झाली तेव्हा त्या वेळच्या सीमाप्रांताच्या २६ लाख लोकसंख्येत खुदाई खिदमतगार तीन लाख होते. म्हणजे दर नऊ माणसांमागे एक या संघटनेचा स्वयंसेवक होता.

## 'आम्हाला लांडग्यांपुढे टाकलेत.'

देशाच्या फाळणीची योजना लॉर्ड मौंटबॅटन यांनी ३ जून १९४७ ला जाहीर केली तेव्हा गफारखानांना मोठा धक्का बसला. या योजनेनुसार सीमा प्रांत हिंदमध्ये समाविष्ट करावयाचा की पाकिस्तानला जोडावयाचा या प्रश्नावर सार्वमत घेतले जाणार होते. वर्किंग कमिटीच्या बैठकीत आपली व्यथा मांडताना ते म्हणाले, 'मी कॉंग्रेसला नेहमी पाठिंबा दिलेला आहे. आता कॉंग्रेसने मला सोडले तर सीमा प्रांतातील लोकात त्याची फार तीव्र प्रतिक्रिया होईल. शत्रू तर हसतीलच, पण मित्रही म्हणतील की कांग्रेसला जरूर होती तेव्हा त्यांनी खुदाई खिदमतगारांना पाठिंबा दिला आणि आता मुस्लीम लीगशी तडजोडीची इच्छा झाली तेव्हा सरहद्द नेत्यांचा सल्ला न घेता फाळणीस असलेला विरोध त्यांनी सोडून दिला. आम्ही पख्तून तुमच्या पाठीशी उभे राहिलो, स्वातंत्र्यासाठी मोठा त्याग केला; पण तुम्ही आता आम्हाला सोडून देऊन लांडग्यांपुढे टाकले आहे. आम्ही सार्वमताला कबूल होणार नाही, कारण निवडणुकात हिंदुस्थान की पाकिस्तान प्रश्नावर आम्ही निर्णायक कौल दिलेला आहे. आता हिंदुस्थान आम्हाला सोडून देत असेल तर पुन: त्याच प्रश्नावर कौल कशाला ? पख्तूनिस्तान की पाकिस्तान या प्रश्नावर सार्वमत होऊ द्या."

नंतर गांधीजींची भेट घेऊन गफारखान म्हणाले, "महात्माजी, तुम्ही आमचा विश्वासघात केलात: आम्हाला लांडग्यांपुढे टाकलेत."

महात्माजी म्हणाले, "सीमा प्रांतास न्याय मिळाला नाही. खुदाई खिदमतगारांवर दडपशाही झाली तर त्यांच्या मदतीस जाणे भारत आपले कर्तव्य मानील."

गांधीजींनी नंतर सरहद्द गांधींचे चिरंजीव घनी यांच्याजवळ याच आश्वासनाचा पुनरुच्चार केला. त्या परिस्थितीत तुमच्या अहिंसेचे काय ? असे घनींनी विचारता गांधीजी म्हणाले, "माझ्या अहिंसेची काळजी करू नकोस. मी अहिंसक असलो तरी सरकार तसे नाही."

गांधीजींचे हे आश्वासन नंतरच्या कॉंग्रेस नेत्यांनी पाळले नाही. त्यांना सरहद्द-गांधींचा विसर पडला. गफारखान व त्यांच्या पठाण बांधवांना इच्छेविरुद्ध पाकिस्तानात सामील व्हावे लागले. त्यांनी आपल्या न्याय्य हक्कांसाठी लढा चालू ठेवला. पंधरा वर्षे पाकमधील तुरुंगात खितपत काढली; पण त्यांना पठाणिस्तान तर मिळाले नाहीच पण सीमा प्रांतही वेगळा न ठेवता पश्चिम पाकच्या एका घटकात तो समाविष्ट करण्यात आला.

पाकिस्तानातून चळवळ चालविणे शक्य नाही असे दिसून आल्यावर गफारखानांनी अफगाणिस्तानात आसरा घेतला. आज वयाच्या ७९ व्या वर्षी ते शरीराने थकले असले तरी त्यांच्या डोळ्यातील तेज आणि पठाणिस्तानचे ध्येय गाठण्याची जिद्द थोडीही कमी झालेली नाही. सीमा प्रांतात टोळीवाले व पाक लष्कर यांच्यातील चकमकींच्या बातम्या मधूनमधून येतच आहेत; पण या बातम्यांपेक्षाही तेथील असंतोष व लढा अधिक तीव्र आहे. आपले ध्येय गाठल्याशिवाय पठाण स्वस्थ बसणार नाहीत व सरहद्द गांधींचे नेतृत्व त्यांना नेहमीच स्फूर्ती देत राहील.

नागा व मिझोंच्या प्रश्नात पाकिस्तान वाटेल तसा हस्तक्षेप करते, त्यांना वाटेल ती मदत देते आणि आम्ही मात्र पठाणिस्तानच्या न्याय्य चळवळीस नैतिक सहानुभूतीसुद्धा दर्शवीत नाही मग इतर मदत बाजूलाच राहिली. ताश्कंद कराराने आमचे हात बांधले गेले आहेत ना? सरहद्द गांधींच्या भेटीचे वेळी तरी या धोरणाचा आमचे सरकार फेरविचार करणार नाही काय? तसे काही होणार नसेल तर सरहद्द गांधींच्या गौरवाची लांबलचक काटेरी भाषणे व त्यांना दिलेले नेहरू पारितोषिक यास काही अर्थ नाही असेच म्हणावे लागेल.

□ □ □

स्वादिष्ट मिठाईसाठी
आम जनतेची निवड

**शर्मा स्वीट मार्ट**

दत्त मंदिराशेजारी, मंडई रस्ता, पुणे २.

सौ. पुष्पा भावे

लघुकथा हा वाङ्मयप्रकार मराठीमध्ये अनेकार्थांनी समृद्ध आहे. मराठी मासिकांचे अंक म्हणजे बव्हंशी कथासंग्रहच असतात; त्यामुळे कथा वैपुल्याने निर्माण होतात. परंतु वैपुल्यातून सपकतेचा धोका निर्माण होत असूनही मराठीमध्ये कथेला, पाश्चात्य संस्कारांपासून अलिप्त अशा पातळीवरही, अत्यंत समर्थ कलात्मक रूप प्राप्त झालेले आहे. सामान्य वाचकही आज 'गोष्ट' ऐकण्यापेक्षाही कथेच्या कलात्मक रूपाविषयी अधिक स्वारस्य बाळगून आहे. याचे कळत नकळत

# सुंठीची फुले

संस्कार नव्या कथाकारांवर होत आहेत. ज्या कथाकारांच्या मनात घटनाप्रधान कथानके आहेत तेही आज ती वेगळ्या रूपातून मांडण्याचा प्रयत्न करीत आहेत.

'सुंठीची फुले' (मुखपृष्ठावर हे शीर्षक व आत 'सुंठीची फुलं' असे शीर्षक) हा श्री. राजा राजवाडे यांचा दुसरा कथासंग्रह आहे. एक कथालेखक या नात्याने मराठी वाचक आता त्यांना ओळखू लागले आहेत. प्रस्तुत कथासंग्रहातील साऱ्या कथा १९६१ ते १९६५ या कालखंडात वेगवेगळ्या मराठी नियतकालिकातून प्रसिद्ध झालेल्या आहेत.

या कथासंग्रहातील पहिल्याच दोन कथा वाचकाचे लक्ष वेधून घेतात. पहिली लेखकाच्या सामर्थ्याची द्योतक आहे तर दुसरी त्याच्या दौर्बल्याची. पहिली 'सुंठीची फुले' ही कथा,

आपल्या तत्त्वनिष्ठ पतीने आपल्याला आयुष्यात रितेच ठेवले अशी कडवट भावना बाळगणारी पत्नी आयुष्याच्या सरत्या काळातदेखील पतीला त्याबद्दल स्पष्ट जाब विचारू शकत नाही; पुन्हा तीच हरते, असा अनुभव व्यक्त करणारी आहे. या कथेतील घटनात्मक तपशील नेहमीचाच – देशभक्त पती–गरिबी–मुलगा लढाईत मारला जाणे – इत्यादी असला तरी या कथेला मोठा लक्षणीय नाट्यपूर्ण घाट देण्यात लेखक यशस्वी झाला आहे. साठी आली तरी ज्याच्या मनातील रसिकता कोमेजलेली नाही असा हा पती आपल्या पत्नीला पछाडणाऱ्या वैयर्थ्याच्या जाणीवेपासून दूर राहू इच्छितो. त्याचा हा प्रयत्न संवादामध्येच धृपदासारख्या पुन्हापुन्हा येणाऱ्या चांदण्याच्या प्रतिमेतून दाखवण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे. या चांदण्याच्याच किमयेमुळे पत्नी आपली कटुता, आपला आकस फार काळ ठेऊच शकत नाही; ते सारे त्या चांदण्यात वाहून जाते. फक्त ही धृपदी प्रतिमा स्पष्ट करण्याची गरज कथालेखकाला का भासावी ते कळत नाही – " चांदणे कधी जुने होत नसते. त्याची बरसात सनातन असली तरी नित्य नव्या तारुण्याने ते मुसमुसत असते " : अशा बटबटीत स्पष्टीकरणामुळे रसिक वाचकाचा मनोभंगच होतो. तरीदेखील या कथेतून निर्माण होणारे, एकांकिकेच्या स्वरूपाजवळ जाणारे असे एकसंध कथारूप मनोवेधक आहे; कथालेखकाविषयी अपेक्षा वाढवणारे आहे.

.........परंतु पुढच्याच कथेत (कथा क्र. २ : पामची कुंडी ) कथानकरचनेतील कारागिरीचे एक कृत्रिम स्वरूप पाहावयास मिळते. श्री. राजा राजवाडे यांची प्रस्तुत मनोविश्लेषणात्मक कथा, गंगाधर गाडगीळ–जी. ए. कुलकर्णी यांच्या कथांवर संपन्न झालेल्या आजच्या मराठी कथाभिरुचीला फारच निराशाजनक वाटते. त्यातील अनुभवाचे बिनसोपे स्वरूप आणि घटना-संवाद यांची कृत्रिम सुबक रचना यांच्यामधील आंतरिक विरोधामुळे रचनादृष्ट्या, ही कथा सदोष झाली आहे. तसेच पामच्या झाडाचे निरोगी, पुष्ट स्वरूप व प्राध्यापक-पत्नीचे सौंदर्य यातील समांतर-रेषा स्पष्ट असताही त्या अधिक स्पष्ट केल्या आहेत. शेवटी आलेल्या रिकाम्या ॲसिडच्या बाटलीच्या उल्लेखाने या कथेतील उरल्यासुरल्या सूचकतेचा बळी घेतला आहे. श्री. गंगाधर गाडगीळ वा – श्री. जी. ए. कुलकर्णी यांच्या कथांचे अनुकरण करण्याचा हा प्रयत्न, या कथालेखकाच्या प्रकृती-भिन्नतेमुळे, खोटा वाटतो.

मात्र या कथासंग्रहामध्ये वेगळे काही करण्याच्या हव्यासापासून अलिप्त असणाऱ्या परंतु (का म्हणून ?) हृद्य अशा काही कथा आहेत. 'पराजिता,' 'नवरा गेला उडत,' 'किल्ला,' 'ती दोघं स्वप्न पाहतात' या कथांमध्ये लेखकाला स्वतःच्या स्वतंत्र कलात्मक व्यक्तिमत्त्वाची जाणीव झाली आहेसे वाटते. एखाद्या व्यक्तीच्या मनाचे लळित तो सहज–मनोवेधकपणे मांडू शकतो. फक्त कथेचा आकार हा अंकगणितातील त्रैराशिकासारखा असावा अशी एक गृहीत कल्पना त्याच्या बऱ्याच कथांच्या घडणीमागे दिसते. कथांच्या शेवटी शेवटी शीर्षकाचे (मध्यवर्ती

कल्पनेचे !) स्पष्टीकरण (उदा० 'किल्ला,' 'डाव सरताना') किंवा प्रमुख व्यक्तींवर कथेतील प्रसंगांचे झालेले परिणाम वर्णन करणारे परिच्छेद, अशा ठिकाणी हीच गृहीतकल्पना दिसते. शिवाय भावना शब्दबाजीतून फुलविण्याचा प्रयत्न आहेच.

या कथासंग्रहातील बहुतेक कथातून व्यक्त होणारे अनुभव प्रतिक्रियात्मक आहेत. कधी त्या आर्थिक परिस्थितीतून निर्माण झालेल्या प्रतिक्रिया ('दी बँक ऑफ मीना लूटेड,' 'ती दोघं स्वप्न पाहतात,' स्वप्न') आहेत, तर कधी दैवगतीविरुद्ध प्रतिक्रिया ('डाव सरताना,' 'किल्ला') आहेत : यामुळे या कथासंग्रहात वेगळे लक्षात राहील असे व्यक्तिमत्त्व निर्माण होत नाही. मग लक्षात राहते ती एखाद्याच 'सुंठीची फुले' या कथेतील दादांची मनोवृत्ती. कथालेखक या नात्याने श्री. राजा राजवाडे यांचे हे अपयश मोठे आहे.

मात्र श्री. राजवाडे यांच्या निरलंकृत भाषेला एक सहजओघ आहे. सुघड कथा लिहिण्याची कारागिरी त्यांना साधते आहे. त्यामुळे त्यांच्या कथांना वाचनीयतेच्या पातळीवर एक निश्चित यश मिळाले आहे; परंतु या यशाने मोहून न जाता त्यांनी स्वतःच्या प्रकृतीला अनुरूप असे अनुभव आपल्या कथातून विनातडजोड मांडण्याचा प्रयत्न करावा. हे प्रयत्न फलदायी व्हावेत इतकी क्षमता त्यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वात निश्चित आहे. □

**[ 'सुंठीची फुले' : ले. राजा राजवाडे; अभिनव प्रकाशन, ७ अबा सदन, जेरबाई वाडिया रोड, परळ – मुंबई १२; १९६९; किंमत : तीन रुपये. ]**





लेखक

**ब्रिगेडियर जे. पी. दळवी**

अनुवाद

**ॲडव्होकेट माधव कानिटकर**

लेखांक

**सव्वीसावा**

**मी** आणि माझी हेड क्वार्टर सांगधरच्या दिशेने वाटचाल करीत होती. वाटेत दर ७० ते ८० सेकंदाला आमच्यावर चिन्यांकडून सतत आणि अचूक भडिमार चालू होता. आम्हाला पुन्हा पुन्हा आडोशाला जाऊन आसरा घ्यावा लागत होता. एखाद्या नाटकातल्या महत्वाच्या पात्राने पुन्हा पुन्हा रंगभूमीवर प्रवेश करावा त्याप्रमाणे या भीषण नाट्यात महत्त्वाची पात्रे असलेले चिनी सैनिक आमच्यावर पुन्हा पुन्हा गोळीबार करीत होते. माझी खात्रीच पटली की चिनी आर्टीलरी ऑब्झर्वेशनचा एक अधिकारी या भडिमाराचे नेतृत्व करतोय. या रणधुमाळीत आमचा जमाव पांगला गेला. आमचा एकमेकांशी असलेला संपर्क तुटला. कोण कुठे सरकतोय ते कळेनासे झाले. परिणामी माझाच माझ्या हेड क्वार्टरशी काही संपर्क राहिला नाही. आम्ही लहान लहान टोळक्यांनी, मिळेल त्या रस्त्याने सांगधरकडे वाटचाल करीत होतो.

अंदाजे दुपारी १ वाजता चिन्यानी त्यांच्याकडून आमच्यावर सतत चालू असलेला गोळीबार बंद केला. मला नक्की सांगता येणार नाही की चिन्यानी गोळीबार का बंद केला ? कदाचित् त्यांच्या जवळचा दारुगोळा संपला असेल किंवा त्यानी विचार केला असेल की, 'बिचारे भारतीय जवान त्यांच्या कमांडरसकट वेडीवाकडी वाट मिळेल तसे मागे पळत सुटलेत, मारून मारून मारायचे तरी किती ? जाऊ दे बिचाऱ्याना.' मी जेव्हा भानावर आलो आणि आजुबाजूला पाहिले तेव्हा माझ्या जवळच मेजर निज्जर, आपल्या तोफखान्याचा कमांडिग ऑफीसर, कॅप्टन गुप्ता, माझा इंटेलीजन्स ऑफीसर, कॅप्टन तलवार आणि इतर ३७ जवान एवढीच मंडळी एकत्र होतो. या सर्व मंडळीत हवालदार ब्रिजपाल सिगचे धैर्य वाखाणण्यासारखे होते.

लवकरच माझ्या लक्षात आले की आता सांगधरकडे जाण्यात काही अर्थ नाही. सांगधरच्या लढाईला साक्षीदार असलेला माझा ब्रिगेड मेजरदेखील माझ्या या मताशी सहमत होईल याची मला खात्री होती. मला विश्वास होता की तो लुंपूकडे जाण्यासाठी निघाला असेल. वस्तुत: अगोदरच त्याठिकाणी आपण असायला हवे होते. सांगधर ह्या ठिकाणी आपले जवान चिकाटीने प्राण पणाला लावून लढत होते. एखाद्या एअरकंडीशन थिएटरमध्ये बाल्कनीत बसून जितक्या सहज सिनेमा पहावा तितक्या सहज सांगधर ह्याठिकाणी चिन्यांना विरोध करणारी दुराग्रही लढाई मी पहात होतो. सांगधर येथे ज्याठिकाणी आपली रसद विमानातून खाली टाकली जात असे त्या ठिकाणचा कबजा घेण्यापूर्वी चिन्यांची पळता भुई थोडी झाली व त्यांना त्यांची व्यूहरचना दोनदा बदलावी लागली इतका जबरदस्त कडवा विरोध आपले जवान त्यांना करीत होते. वस्तुत: हे धट्टेकट्टे शिख जवान आपल्या पॅरॅशुट ब्रिगेडचे होते. त्याना हुकूम दिला गेला होता तो जमिनीवर समोरासमोर लढण्याचा आणि तरीदेखील ते पायदळ तुकडीतलेच जवान भासावेत अशा कौशल्याने ते सहज चिन्यांशी सामना करीत होते. प्रचड आणि प्रबळ चिनी सैन्याबरोबर ते कसे धैर्याने लढताहेत हे मी घोला आणि सांगधर ह्यांना वेगळे करणाऱ्या मधल्या दरीतून पहात होतो. मोकळ्या मैदानात घुसून आपल्या जवानांनी जेव्हा त्यांच्यावर गोळीबार चालू केला आणि त्यांचे चार हल्ले परतवले तेव्हा माझा ऊर अभिमानाने भरून आला. अखेर आपल्या जवानांजवळचा दारुगोळाच संपला आणि मग मात्र चिन्यांनी पुढे धडक मारून आपल्या जवानांना मागे हटवले.

आपले हे जवान त्याठिकाणी दुपारी १२ पासून ३ ।। पर्यंत उत्तम लढत होते. सांगधरपासून माघार घेणाऱ्या आपल्या एका जवानाने त्याच्या बंदुकीतली शेवटची गोळी झाडली. त्या गोळीचा आवाज मी ऐकला तो ४ वाजता. आता सगळे संपले होते. त्याने मारलेली शेवटची गोळी हे फक्त आपल्याकडून होत असलेल्या विरोधाचे प्रतिक होते. थागला प्रदेशातली लढाई त्या शेवटच्या गोळीनंतर संपली होती.

मला अशी आशा होती की निदान हाथुंगला मार्ग तरी चिन्यांनी फारशी प्रगती केली नसावी. त्या मार्गातले आपले पंजाबी जवान आणि Grenadiers ह्यांच्या-वरच आता माझी भिस्त होती. मी कळकळीने आकाशाकडे बघून परमेश्वराची करुणा भाकली की, " परमेश्वरा ! चिन्यांना निदान तिथे तरी यश देऊ नको ! " चिन्यांच्या पुढच्या हेतूचा मी अंदाज बांधत होतो. १९ ऑक्टोबरपर्यंत चिनी मोठ्या प्रमाणावर काही करणार नाहीत असे पूर्वी म्हटले जात होते. म्हणजे काय ? मोठ्या प्रमाणावर म्हणजे किती मोठ्या प्रमाणावर ? अर्थ होता का त्या शब्दाला ? समोर काय चालले आहे ते मी पहात होतो. आता सरकारी शब्दांवर अवलंबून रहाण्यात अर्थ नव्हता. आता मला स्वतःलाच माझे अंदाज बांधायचे होते. एक सोल्जर या नात्याने मी ताबडतोब समजून चुकलो की चिन्यांना कमीत कमी सांग-धर–हाथुंग-ला–ड्रंगकंग संबा पुल याना जोडणाऱ्या रेषेपर्यंतची जमीन ताब्यात हवी आहे. त्यामुळे मॅकमोहन रेषा ही सरहद्द म्हणून आम्ही मानत नाही हे चिन्यांचे म्हणणे खरे ठरणार होते आणि शिवाय आपले सांगधर या ठिकाणी असलेले विमा-नातून रसद खाली टाकण्याचे महत्त्वाचे ठिकाण (ड्रॉपिंग झोन) कायमचेच त्यांच्या ताब्यात जाणार होते. आपली सबंध ब्रिगेड या ड्रॉपिंग झोनवरच जगत होती. भार-तीय हद्दीत या पेक्षा जास्त पुढे घुसण्याचा मात्र चिन्यांचा विचार नसावा.

सरतेशेवटी मी सखिमला जायचे ठरवले. लष्करी नियमाप्रमाणे ऑफिसरने अखेरपर्यंत शक्य असेल तिथे जाऊन लढले पाहिजे. सखिम या ठिकाणी आपल्या जवानांची एक कंपनी होती. सखिमला पोचण्याच्या मार्गात घोला या ठिकाणी १८,५०० फूट उंच कडा चढून जावा लागणार होता. पण काय करणार ? दुसरा इलाजच नव्हता. तसे बघायला गेले तर उंच प्रदेशात चढ उतार करणे ह... आता मला नवीन नव्हती. तरी काय झाले ? १८,५०० फूट ऊंच चढायचे ? माझ्या पायात साधे रबरी गम-बूट होते. साध्याच कापडाची एक पॅंट, तरीपण निश्चयाने आम्ही तो उभा कडा चढून जाऊ लागलो. आम्हाला वाटेत थांबावेच लागले; कारण थंडी मरणाची होती आणि दुपारचे ४ वाजलेले असून देखील तिथे अंधार पडू लागला होता. सूर्य मावळला. तो कडाच असा होता की त्याच्यावर हिरव्यागार झुडपांचे रान माजले होते. गुंतागुंतीच्या, घनदाट, अभेद्य झुडपातून रस्ता काढीत चालत रहाणे या सारखा दुसरा कुठला वैताग या जगात नसेल. आम्हाला सुमारे १७,००० फूट उंच गेल्यावर एक लहानशी गुहा दिसली. आम्ही ठरवले की सकाळ होईपर्यंत या गुहेतच वस्ती करायची. इतक्या माणसांनी एका लहानशा खबदाडात एकत्र झोपणे मला कसे तरीच वाटले पण दुसरा इलाजच नव्हता.

बुद्धी किंवा पैसा यांच्यापेक्षा पोट मोठे हेच खरे. जेव्हा आम्ही भानावर आलो तेव्हा पोटात कावळे कोकलायला लागले. आमच्या लक्षात आले की, गेल्या २४ तासात आम्ही अन्नाचा एक घास देखील खाल्लेला नाही.

माझ्या पुरतेच बोलायचे झाले तर मी शेवटचे जेवण जेवलो तेव्हा फक्त २ चपात्या आणि मूठभर वाटाण्याची उसळ खाल्लेली होती. पुढचा महत्त्वाचा आणि भेडसावून टाकणारा विचार हा होता की आपल्या जवानांजवळ पोहोचेपर्यंत – आपल्याला वाटेत काहीही खायला मिळणार नाही. आमच्याकडे नव्हते नकाशे, ना मार्गदर्शन; कारण कुणीच दुर्दैवी लान्स नाईक आता आघाडीवर पाठवला जात नव्हता. प्रत्येकाचा विश्वास काय तो माझ्या ज्ञानावर आणि मार्गदर्शनावर.

खरे सांगायचे तर आपले मेजर निज्जर हा इसम या संकटाला तोंड द्यायला लायक नव्हता. त्याला नाम-का-चू च्या परिसरात आघाडीवर पाठवायलाच नको होता. आघाडीवर त्यांना असह्य मानसिक आणि शारिरीक त्रास झाला. त्यांचे हे हाल मी पहात होतो. तरी देखील निश्चयाने आणि धैर्याने ते या संकटाला तोंड देत राहिले आणि ते देखील कसलीही तक्रार न करता याचे मला कौतुक वाटले. मेजर निज्जर १७ ऑक्टोबरला माझ्या हेडक्वॉर्टरमधे येईपर्यंत त्यांची माझी ओळख नव्हती. आमचा सहवास तो किती? फक्त ४ दिवसांचा! तरी देखील त्यांनी वाटेत आग्रह धरला की मी माझ्या हातातली बॅग त्यांच्याकडे द्यावी. का? कारण तो फक्त मेजर तर मी ब्रिगेडियर. त्यांचा हा आग्रह पाहून माझे हृदय द्रवले. मी त्यांना समजावून सांगितले की लष्करी शिस्त, रितीरिवाज काटेकोरपणे पाळण्याची ही वेळ नव्हे. त्यावर ते मला म्हणाले. "ते काही नाही साहेब, किती झाले तरी तुम्ही कमांडर आहात, तुम्हाला मी हातात काही घेऊ



देणार नाही. जोपर्यंत मी तुमच्या जवळ आहे आणि जिवंत आहे तोपर्यंत तुमची बॅग मीच घेणार."

वाटेत एके ठिकाणी एक जवान बिचकत बिचकत माझ्याजवळ आला. त्याला भिती वाटत होती की ब्रिगेडीयरशी एकदम कसे बोलायचे!

तरीदेखील धीर करून तो मला म्हणाला, "साहेब! मी बराच वेळ बघतोय. तुम्ही बऱ्याच वेळात सिगरेट ओढलेली नाही. मला ठाऊक आहे की तुमच्या असल्या तर तुम्ही फार सिगरेटस् ओढता, तुमच्याकडे अत्ता पाकिट नसावे, हे माझ्याजवळचे घ्या. लगेच दुसऱ्या जवानांनी काही न बोलता त्याची काडेपेटी मला दिली. हे प्रसंग तुम्हाला लहान-सहान वाटतील पण ह्या प्रसंगामागे खूप अर्थ आहे. त्यावेळी सिगरेट पेटवताना माझे अंतःकरण भरून आले. मला अभिमान वाटला की जगातल्या एका उत्तम प्रतीच्या आर्मीमध्ये मी आहे. अनेक मरणांतिक संकटांना तोंड देऊन असह्य दुःख भोगून आणि मृत्यु समोर दिसत असतानासुद्धा भारतीय लष्करातले जवान आणि अधिकारी, वरिष्ठ अधिकाऱ्यांबद्दल आणि परस्परांबद्दल लष्करी शिस्त पाळून किती आदर आणि सदिच्छा बाळगतात ते तुम्हाला ह्या लहानशा प्रसंगातून कळेल.

२१ ऑक्टोबर १९६२ ला पहाटे ३॥ वाजता आम्ही धोला प्रदेशातल्या त्या भयकर १८५०० फूट उंचीवर असलेल्या कळसाच्या दिशेने निघालो. त्या कळसावरच्या असंख्य, सखोल चिरा आणि फसवे सुळके पार करताना आम्हाला वाटेत अनेक ठिकाणी थांबावे लागले; कारण चिऱ्यांच्या वर आम्हाला आघाडी मारायची होती आणि त्यासाठी झपाझप पावले उचलणे आवश्यक होते. पण आमच्या उर्वरीत तुकडीपैकी जे कोणी आमच्या गतीने चालू शकत नव्हते ते मागे पडत होते. व त्यापैकी एकएक जण गळत चालला होता. पर्वतमय प्रदेशात ही परिस्थिती हलाखीची होती.

आता दुपार झाली होती. मेजर निज्जरना इतक्या उंचीवर चढून जाण्याची सवय नव्हती. त्यांना श्वासोच्छ्वास करता येत नव्हता. त्यांना धाप लागली होती. तर कॅप्टन गुप्तांना अतिशय थंडीमुळे धड चालता येत नव्हते. तलवार यांच्या पोटात दुखायला लागले. त्यांना आधीच पोटाचा विकार होता. त्यांच्या नेहमीच्या गोळ्या ते सारखे खात होते तरी काही उपयोग होत नव्हता. तुम्हाला खोटे वाटेल पण इतक्या उंचावर चढून आल्यानंतर देखील ज्याला काहीही शारिरीक त्रास झाला नाही असा आमच्या पार्टीतला माणूस म्हातारा होता. आमच्या लवकरच लक्षात आले की इच्छित स्थळी लवकरच पोचायचे असेल तर आता एका पार्टीच्या दोन पार्ट्या करायला हव्यात.

या धोला प्रदेशातल्या कड्यावर रस्ता इतका बिकट होता की शिखर असे कुठे नव्हेतच. सगळा फसवा मार्ग. दुरून डोंगर साजरे. आम्ही मोठ्या कष्टाने ती वाट-

चाछ करील होतो. आशा ही बाळगून की सर्खीमजवळच्या हायुंगला–लुंपू या मार्गावर आम्ही असू.

आता माझ्या पार्टीत मी धरून मोजून १ डझन माणसे होती. माझा खास नोकर आता फार मागे पडला होता. इतके कष्ट सोसून देखील माझा ट्रॅन्झीस्टर तो दुसऱ्या कुणाच्या हातात द्यायला तयार नव्हता. आठ दिवसानंतर तो ब्रिगेडला येऊन मिळाला आणि ब्रिगेड मेजरला सलाम ठोकून म्हणाला. "माझे ब्रिगेडियर साहेब कुठे आहेत! त्यांचा हा रेडिओ मला त्यांना द्यायचाय." मेजर निज्जर आणि कॅप्टन गुप्ता त्या दिवशी एक पाऊल पुढे टाकू शकले नाहीत. आधीच शारिरीक व्याधी, तशातच वाटेत त्यांना अन्न–पाणी काहीच मिळाले नाही. त्यांचा त्रास आणखीनच वाढला. त्यांना सांगितले की, "आम्ही पुढे जातो तुम्ही इथेच थांबून जरा विश्रांती घ्या." त्या दोघांची काळजी घेण्यासाठी मी काही जवान त्यांच्या जवळ ठेवले. ...आणि कॅप्टन तलवारने तर कमालच केली! स्वतःची तब्येत बिघडलेली असतानासुद्धा तो मला म्हणाला, "नाही! साहेब नाही! मी मागे थांबणार नाही! अशा बिकट परिस्थितीत माझ्या कमांडरला ऑफिसरच्या संरक्षणाशिवाय इतस्ततः मी भटकू देणार नाही!"

ज्या मेजर निज्जर आणि कॅप्टन गुप्तांची माझ्यावर श्रद्धा आणि अतूट प्रेम होते त्यांना मीच सोडून चाललो होतो! माझे अंतःकरण फाटून गेले. वाटले बहुतकरून यांना वाटेतच चिनी पकडतील किंवा थंडीने व उपासमारीने ते वाटेतच मरतील. त्यांना मी निरोप दिला तेव्हा मी माझे अश्रू आवरून धरले. माणसाच्या इच्छा, कल्पना, आणि भावना या पेक्षा त्याचे दैव मोठे हेच खरे. मेजर निज्जर आणि कॅप्टन गुप्ता चिन्यांना चुकवून भूतानमार्गे भारतात सटकले, आणि चिन्यानी मला पकडले.

हवालदार ब्रिजपालसिंग यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे सात तगड्या जवानांच्या कडेकोट बंदोवस्तात मी आणि कॅप्टन तलवार पुढे निघालो. माझ्या अंदाजाप्रमाणे आम्ही सखिमच्या दिशेनेच चाललो होतो. कसे चाललो होतो आम्ही? कधी पुढे जावे तर पुढे रस्ताच नाही! फक्त उच कडा! तो चुकवण्यासाठी मागे परत येऊन दुसरी वाट काढायची. तर कधी खाली जाताना पार्श्वभाग जमीनीवर टेकवून सरपटत जायचे. वाटेत छोट्या छोट्या नद्या लागल्या. त्यातल्या गुळगुळीत आणि शेवाळानी मढलेले दगड-गोटे चुकवताना आमचे हाल झाले. कुणाला अपघात झाला असता तर त्याला तसाच निष्ठूरपणे सोडून देऊन बाकीच्याना (!) पुढे जावे लागले असते. अरे! एका माणसाला नीट चालता यायची मारामार तर अपघात झालेल्याला उचलून घेऊन काय चालणार! आम्ही सगळेच अशक्त आणि उपाशी होतो. अशा वेळी कितीही आपुलकी वाटली तरी आपल्या कॉम्रेडला उचलून नेता येणे शक्यच नव्हते. एकदा तर चालताना मी ३० फूट खाली कोसळलो!

आता अंधार पडू लागला होता. आता पुढे जाता येणे शक्यच नव्हते. नाइला-

जास्तव मी ठरवले की आता इथेच थांबायचे. शेवाळानी भरलेल्या एका जल-प्रवाहाजवळच्या दमट जमिनीवर आम्ही थांबलो. थोडी उब यावी म्हणून आम्ही शेकोटी पेटवली, पण लाकडे ओली. शेकोटीच विझली.

सतत दोन दिवस आम्ही कुणी काहीच खाल्लेले नव्हते. दोन दिवस खऱ्या अर्थाने उपास! पाणी प्यायला जावे तर ते इतके गार असे की पिववत नसे! खराब पाणी प्यायल्यामुळे आम्हाला सर्वांनाच त्रास होत होता. थकल्या भागल्या अवस्थेत आम्ही पुन्हा एकदा सखिमकडे निघालो. मला आता मात्र शंका आली की आम्ही रस्ता चुकलो आहोत. चिन्यांच्या हद्दीत तर आम्ही जात नाही ना? या अपराधाची शिक्षा आहे देहान्त प्रायश्चित्त! आम्ही आता किती वेळ चालू शकू हेच मला कळेना, कारण सतत ६० तास आम्ही अन्न-पाणी आणि झोप याशिवाय फक्त चालतच होतो!

आता हळूहळू आम्ही कडा उतरू लागलो होतो. सकाळचे अदाजे ६ वाजले होते. आणि...अहो आश्चर्यम्! आमच्या खालीच असलेल्या जमिनीवरून लेफ्ट राईट! लेफ्ट राईट करीत चिन्यांची एक तुकडी रांगेत चालली होती! प्रत्येकाच्या हातात शस्त्र. तुकडी कसली? प्रचंड 'मोर्चाच' होता तो चिन्यांचा! कुणीतरी जादू टाकावी तसा डोळे फिरवून मी पाहातच राहिलो. चाऊ-एन्-लायने त्याची धमकी पूर्ण केली होती तर! हे चिनी सैनिक मॅकमोहन रेषा तुडवून भारतीय हद्दीत कितीतरी आत


# इझिडेन्ट

लहान मुलांना दात सुलभ रीतीने येण्यास मदत करते.

ताप, जुलाब, सर्दी वगैरे कोणताही त्रास होत नाही.

प्रतिबंधक म्हणून चौथ्या महिन्यातच सुरू करा.

उत्पादक :

**न्यू इरा**
**होमिओपॅथिक फार्मसी**

दादर रेल्वे स्टेशनसमोर (पश्चिम) मुंबई-२८.

एजन्सी नसलेल्या गावी एजन्टस् नेमणे आहेत.

घुसले होते. माझी खात्रीच पटली की ते लुंपू आणि सखिमकडेच चालले आहेत. सखिम! जिकडे आम्ही चाललो होतो! आमच्या आधीच ही झुंड तिथे पोचणार होती. लुंपू या ठिकाणी आपले रसद खाली टाकण्याचे ठिकाण होते ते आता चिन्यांना हवे होते, कारण एकदा का त्या ठिकाणाचा कबजा चिन्यानी घेतला की भारतीय सेनेला निम – जांग – चू नदीच्या खोऱ्यातून सुद्धा माघार घ्यावी लागणार होती. अन्न घेऊन वरती विमान येईल तरच जवान जगणार आणि लढणार. आता भारताचे जवान जगणार कसे? आपोआप मागे हटतील, कारण रसद खाली टाकायला त्या प्रदेशात लुंपू सारखे दुसरे कुठले सोइस्कर ठिकाण नव्हते. आणि लुंपू तर चिन्यांच्या ताब्यात. आता आम्ही खरे अडचणीत सापडलो होतो. मागे जावे तरी चिनी, पुढे जावे तरी चिनी! मला आपल्या पंजाबी जवानांची काळजी वाटली. चिन्यांच्या पोतडीत तर ते गेले नसतील ना? चिनी सैनिकांची ती प्रचंड शोभा–यात्रा आम्ही डोळ्यांनी पाहिली होती. आता सखिम किंवा लुंपूकडे जाण्यात अर्थ नव्हता. वाटेत असलेली एक कंपनी ते खलास करून टाकणार हे निश्चित.

झिमिथांग या ठिकाणी असलेल्या आपल्या डिव्हिजनल हेडक्वार्टरला जाऊन मिळायचे असा मी ताबडतोब निर्णय घेतला. शेवटची आशा आता ही उरली होती की ड्रकंग – संबा ब्रिज जर का उद्ध्वस्त झाला असेल तर तो पुन्हा बांधून काढेपर्यंत काही चिनी तिथून पुढे सरकू शकणार नाहीत. चिन्यानी चारी बाजूनी रचलेला अभेद्य व्यूह छेदून झिमिथांगला पोचायची ती एकमेव आशा होती. हा विचार करताना मला कल्पनाही नव्हती की २१ ऑक्टोबरलाच हेडक्वार्टर सोडून देऊन झिमिथांगपासून आपल्या सैन्याने माघार घेतलेली आहे. तिथे आपला असा कुणी नाहीच आहे! २० ऑक्टोबरलाच किंझमानेवरून चिन्यानी अशी जबरदस्त धडक मारली होती की २० ऑक्टोबरच्या रात्रीच झिमिथांगपासून ते अवघ्या दोन मैलावर आले होते. आपली हेडक्वार्टर, मेडिकल युनिटसकट माघार घेऊन अक्षरशः चिन्यांसाठी मोकळी होती!

जनरल कौल यांच्या आजारपणामुळे निर्माण झालेल्या अनुपस्थितीत आपले आर्मी कमांडर, २०-२१ ऑक्टोबरलाच माघार घ्यावी लागली तर ती कुठून कशी घ्यायची याबाबतीत निर्णय घेण्यासाठी, या डिव्हिजनल हेड क्वार्टरवर यायचे होते; पण ते कधी आलेच नाहीत!

GOC 4 डिव्हिजनने (जनरल ऑफीसर कमांडिंगने) २१ ऑक्टोबरलाच तावांगपासून माघार घेण्याचा निर्णय घेतला. एक भले मोठे हेलिकॉप्टर आपल्या जखमी जवानांना हलवण्यासाठी तिथे उतरवले गेले. जनरल या दर्जाच्या खाली असलेला प्रत्येकजण पायीच माघारी चालू लागला. आणि मेजर-जनरल? की जो त्या विभागापुरता अर्थाअर्थी 'कोअर कमांडर'च असतो त्याची सोय काय? इंडियन आर्मीजवळ त्याला उचलायला दुसरे हेलिकॉप्टरच नव्हते.

तावांग सोडून वाट मिळेल त्या मार्गाने भूतान मार्गे हे सर्व जवान मागे हटले होते.

२१ ऑक्टोबरलाच आपल्या मागे पळत सुटलेल्या सैन्याच्या मागावर राहून चिनी लुंपूला पोचले होते. निम-जांग-चू च्या परिसरात चिन्यांनी नेत्रदीपक यश मिळवले होते. आता चिनी निषेध-खलिते लिहीत बसत नव्हते, आपल्या जवानांना नुसतेच ढकलून देत नव्हते, कुरापती काढत नव्हते, आता त्यानी सरळ सरळ आक्रमण केले होते. भारतीय हद्दीत ते घुसले होते. भारताचा तिरंगी झेंडा त्यानी खाली उतरवला होता. तो पुन्हा वर चढवायचा असेल तर एक चीनचे पंतप्रधान चौ-एन्-लाय यांची संमती घेऊन किंवा चिन्यांच्या सणसणीत थोबाडात मारून.

एकूण १८००० फूट उंचीचा धोलाचा कडा आता आम्ही ८००० फूट खाली उतरलो होतो. आता आम्ही १०,००० फूट उंचीवर होतो. पुन्हा मागे वळून तो कडा वर चढून जाणे केवळ अशक्य होते. एकतर आम्ही दमलेले आणि भुकेलेले, तशातच मागून चिनी केव्हा गाठतील याचा नेम नाही. एकच रस्ता आता मोकळा होता, निम-जांग-चू नदीच्या परिसराकडे जाणे.

त्या चिनी सैनिकांच्या मोर्चाचे शेपूट धरून आम्ही चालू लागलो. क्षणभर मी माझ्या पुढचा मार्ग काढण्याच्या कौशल्याचे स्वतःच कौतुक केले. चिन्यांचा कैदी म्हणून परत त्याच वाटेने चालत येताना कळले की आम्ही सखिमपासून अवघे अर्ध्या मैलावर त्यावेळी पोचलो होतो.

लवकरच आम्ही एका टेकडीचा उतार पार करून खाली उतरलो. आमच्या लक्षात आले की आम्ही आता एका घनदाट जंगलात शिरलो आहोत. जंगलातून चालत असताना अचानक समोर आणखी एक कडा लागला. आता चालायला जमीन नव्हती. तिथून मागे परत चालत जाण्याशिवाय गत्यंतर नव्हते. सहजप्रवृत्ती-प्रमाणे मन सांगेल तसे आम्ही परत मागे चालू लागलो. त्यात ज्ञानापेक्षा मनावरच भरवसा जास्त होता.

मी सगळ्यांच्या पुढे चाललो होतो. इतर सातजण माझ्या मागोमाग येत होते. आणि चालता चालता ध्यानीमनी नसताना आम्ही सरळ ज्या ठिकाणी चिन्यांची एक पायदळ कंपनी विश्रान्ती घेत पहुडली होती त्यांच्या मधून चालू लागलो. अचानक चारी बाजूंनी चिनी बंदुकांच्या नळ्या आमच्यावर रोखल्या गेल्या आणि गुरकावून चिनी भाषेत ते रेकून ओरडले की, "थांबा! शस्त्र हातात असेल तर फेकून द्या! आणि उभे रहा!" मला अजून खात्री पटत नाही की चिन्यांना तिथे पाहून आम्हाला आश्चर्य वाटले की आम्हाला तिथे पाहून चिन्यांना जास्त आश्चर्य वाटले.

मी घड्याळ पाहिले. २२ ऑक्टोबर ११६२ ला सकाळी बरोबर ९ वाजून २२ मिनिटांनी मी चिन्यांचा युद्धकैदी बनलो. चायनीज पिपल्स लिबरेशन आर्मीचा युद्धकैदी!

त्या क्षणी मी ६६ तासांचा उपाशी होतो. १४,५०० फूट उंच चढून १०,५०० फूटापर्यंत खाली उतरलो होतो, दमलेला होतो, माझी दाढी वाढली होती, घशाला कोरड पडली होती आणि कांटेरी झुडपातून वाट काढता काढता कपडे फाटलेले होते.

अविश्वसनीय, अघटित आणि विचित्र अशा सप्टेंबर–ऑक्टोबर १९६२ मधल्या घटनांचा हा शेवट होता. जो प्रदेश एकेकाळी माझ्या देशाचा भाग होता तिथेच मला शत्रूने अटक केली होती. आता ज्या चिनी कॅप्टनने मला पकडले होते त्याच्या मी सर्वस्वी आधीन होतो. त्याच्या दयेवर जगणार होतो. माझी कर्तृत्वशक्ती त्या क्षणीच मेली. वाटले; उगाच जिवंत राहिलो मी ! हा क्षण येण्यापूर्वीच मेलो असतो तर बरे झाले असते. ज्यानी सतत २० वर्षे फक्त हुकूम सोडले त्या भारताच्या कमांडरला आता चिनी कॅप्टन हुकूम सोडणार ! खऱ्या सोल्जरला शत्रूकडून अटक झाली की त्याला स्वतःचीच किती शरम वाटते ते तुम्हाला सोल्जर होऊन अटक झाल्याशिवाय कळणार नाही.

चिन्यांनी मला ताबडतोब ठार कसा केला नाही याचेच मला आश्चर्य वाटतेय. आतापर्यंत इतके हाल सोसून मी आजारी पडलो नाही, लढाईत कुठेही जखम झाली नाही त्या अर्थी मी सुदैवी असलो पाहिजे असा विचारच केला नव्हता. आतापर्यंत माझ्या मनाने आणि पर्यायाने शरीराने असह्य मनःस्ताप, हाल, दुःख धोके, उपास, थंडी, जागरण आणि चढउतार पाहिले होते. त्या प्रत्येक वेळी अपमान, राग, नैराश्य आणि जे जवान मेले त्यांच्याबद्दलचे अपरिमीत दुःख एवढे सगळे पाहिले होते....आणि कळस म्हणजे आता माझे असे हे मन आणि शरीर चिन्यांच्या अटकेत होते.

सातव्या पायदळ तुकडीचे हाल आणि अखेरचा मरणांतीक लढा सांगावा तेवढा थोडा आहे.

या लढाईत ज्यांची सतत फसवणूक केली गेली होती अशा भारतीय जवानांचा मानभंग आणि निराशा यांची हद्द झाली. तरी देखील ते धैर्याने लढले. आणि त्यांची योग्यता फार मोठी असून देखील अखेर पाषाण हृदयी दैवाने त्यांची दाणादाण उडवली. भवितव्यता भीषण आहे हे ठाऊक असून आपले जवान लढले ते फक्त त्यांच्या शौर्याचा वारसा हक्क सांगून.

आपले कित्येक जवान भुकेने मेले तर कोणी थंडीने मेले. जे मेले नाहीत आणि ज्यांना चिनी पकडू शकले नाहीत असे जवान त्यांच्या हालांना आणि मनःस्तापाला जबाबदार असणाऱ्यांच्या नावाने पुन्हा पुन्हा बोटे मोडत असतील. अरे ! कुठ फेडाल हा त्यांचा तळतळाट ! जेव्हा आघाडीवरच्या जवानाला खायला अन्न मिळत नव्हते तेव्हा भारतातले श्रीमंत आई–बाप आपल्या लाडक्या चिरंजीवांना बरोबर घेऊन मिठाईवाल्याच्या दुकानात घेऊन जाऊन त्यांचे लाड पुरवीत होते. देश ? जवान ? याची होती कुणाला आठवण ? ६२ च्या पराभवाची जबाबदारी आपल्या-

पैकी प्रत्येकावर आहे. सप्टेंबर – ऑक्टोबर ६२ मध्ये जवानांसाठी आपण काय करीत होतो ते आठवा आणि मगच भारतीय जवानांबद्दल बोला.

आता ही पहा भारतीय जवानांच्या प्रेतांची चिन्यानी केलेली मानखंडना ! असंख्य भारतीय जवानांच्या प्रेतांची चिन्याना तो कोण होता त्याची ओळखच पटेना. कारण त्यांच्याजवळ ओळख पटवणारे बिल्ले नव्हते (Identity discs). त्यांच्या प्रेताची झडती घेऊन झाल्यानंतर चिनी सैनिक खदखदा हसून म्हणत होते की, "कुत्रा सांपडला ! पण त्याला पट्टाच नाही आहे !" (dog-tags !)

काय वाटले असेल मला ते ऐकून ? तुम्हाला काय वाटते ?

आपल्या उणीवा आणि चुका यांची दखल घेतली गेली पाहिजे. भारत सरकारने अज्ञानात राहून घाईघाईने काही निर्णय घेतले आणि पराभव झाल्यानंतर आरामात कपाळाला हात लावून बसले !

... अजून वेळ गेलेली नाही. निराश होण्याचे कारण नाही. आपण हरलो म्हणून विषाद बाळगण्याचे कारण नाही. भारतीय लष्कर मजबूत आहे. आपल्या जवानाला अव्हेरु नका. या पराभवाने प्रत्येक भारतीय नागरिकाला धडा शिकवला की, "तू तुझे कर्तव्य नीट बजाव तरच तुझा देश सामर्थ्यसंपन्न बनेल !" आपला भोळेपणा, दुर्लक्ष, आणि देश विसरून जाण्याची वृत्ती हे तिन्ही दुर्गुण थागला – प्रदेशात गाडले गेले असे समजू या ! आपण हा धडा घेऊ की लढाई म्हणजे बडबड नव्हे तर लढाईशी सामर्थ्याचा संबंध आहे ! लढाई म्हणजे कौशल्य आणि मनोधैर्य. – निषेध खलीते कसले पाठवता ? आपण हा धडा शिकलो की राजकारणी, दिवाणी नोकर आणि मिलीटरी हायकमांड या तिघात एकवाक्यता पाहिजे. तिघानी मिळून लष्करी नीती-नियमांचे पालन केले पाहिजे. सर्वांनी सावध असले पाहिजे. देशाच्या संरक्षणाचा प्रश्न मोजक्या लोकनियुक्त प्रतिनिधींवर अवलंबून असता कामा नये. तो प्रश्न प्रत्येक भारतीय नागरिकाचा आहे.

भारतीय जवानांचा सोशिकपणा, चिकाटी आणि शौर्य याचे मला खरोखरीच आश्चर्य वाटते. निःशंक मनाने आणि बेडरपणे ते वरिष्ठ भारतीय लष्करी अधिकाऱ्याच्या मागोमाग येतात आणि पुढे जातात ! चिन्यांपुढे त्यांनी दारुगोळा संपेपर्यंत कच खाल्ली नाही ! भारत सरकारने त्यांच्या शौर्याचे योग्य ते चीज केले नाही हे या देशाचे दुर्दैव आहे. योग्यता असून भारतीय जवानाला कुणी मानाचा मुजरा करीत नाही.

... हे माझे पुस्तक म्हणजे भारतीय सेनेतल्या जवानांना वाहिलेली पुष्पांजली आहे !

# स मा प्त

४ ऑक्टोबर १९६९

# बालगंधर्व मंदिराने केलेली

शरद गोखले

प्रकरण चांगलेच रंगणार अशी लक्षणे दिसू लागली आहेत. सरकारी स्पर्धा आल्यावर संबंधीत मंडळी नवीन नाटक शोधण्यात, आणि कलाकारांची निवड करण्यात दंग असतात. यंदा स्पर्धांची चाहूल लागली ती एका वेगळ्या घटनेने. स्पर्धेला बालगंधर्व रंगमंदिर मिळणार नाही हे निश्चितपणे समजल्यावर हवा तग झाली आहे. आणि महाराष्ट्रीय कलोपासक, भरत नाटय मंदिर, सरस्वती मंदिर नटसंघ, आदी मातब्बर संस्था बहिष्कार पुकारण्याच्या मनःस्थितीत आहेत.

साधारणपणे ऑगस्टच्या ३-४ तारखेला पुण्यातील हौशी संस्थांमध्ये बातमी आली, की यंदा गंधर्व रंगमंदिर नाही. टेलिफोनवरून संपर्क साधून बातमी तातडीने समाजकल्याण खात्याचे चिटणीस आणि स्पर्धा संयोजक श्री. राजाराम हुमणे यांना कळविण्यात आली. वृत्ताचे स्वरूप अधिकृत नव्हते तरी हुमणेसाहेबांनी गंधर्व रंग-मंदिराचे व्यवस्थापक श्री. सबनीस यांच्याशी संपर्क साधला. सबनीस यांनी पत्र पाठविण्यास सांगितले. ताबडतोब पत्र रवाना झाले. स्पर्धांच्या कच्च्या तारखा व रंगमंदिर देण्याची पद्धत लक्षात घेता १५ ऑगस्ट पूर्वी पत्र व्यवस्थापकांचे हातात पडणे आवश्यक होते. त्याप्रमाणे मुदतीत पत्र रवाना झाले. साधारण ३-४ सप्टेंबरचे सुमारास येथील समाज कल्याण खात्यातील एक अधिकारी श्री. क्षीरसागर रंग-मंदिरावर चौकशी करण्यास गेले असता व्यवस्थापक महोदयांनी शांतपणे सरकारी अर्ज उशिरा आल्याचे सांगितले, अर्ज नियमाप्रमाणे वेळवर दाखल झाला आहे हे दाखवून देण्यात आले. तथापी तारखा देऊन झाल्या आहेत आणि आता तारखा देणे शक्य होणार नाही असे सांगण्यात आले. आणि स्पर्धेला पुण्यात नाटयगृह उपलब्ध न होण्याचा अभूतपूर्व प्रसंग निर्माण झाला.

सरकारी पातळीवरून रंगमंदिर मिळविण्याच्या प्रयत्नास सुरुवात झाली. राज्य नाटय महोत्सवाच्या सल्लागार मंडळाचे सदस्य मधु लोखंडे, राजा नातु, वसंत

# हौशी कलाकारांची आबाळ

लोणकर, समाज कल्याण खात्याचे अधिकारी श्री. क्षीरसागर व पानसे यांच्यासह कमिशनर श्री. मोघे यांना भेटावयास गेले. जुजबी बोलणी झाल्यावर कमिशनर-साहेबांनी त्यांची रवानगी बालगंधर्व रंगमंदिराचे काम पहात असलेले सहाय्यक कमिशनर श्री. अनंतराव जाधव यांच्याकडे केली. रंगमंदिराच्या तारखा देण्याची कामगिरी जाधव – सबनीस जोडी करते. त्यामुळे स्पर्धेसाठी रंगमंदिर का देण्यात येणार नाही याचे स्पष्टीकरण देण्याची जबाबदारी याच जोडीवर पडली.

रंगमंदिर स्पर्धेला दिल्याने कार्पोरेशनचे आर्थिक नुकसान होते – कसे, तर स्पर्धेसाठी नाट्यगृह ८ तास आधी संबंधीत नटसंघाच्या ताब्यात द्यावे लागते. त्यामुळे दुपारच्या खेळांचे उत्पन्न बुडते. सलग १०-१२ दिवस स्पर्धेसाठी नाट्यगृह दिल्याने व्यावसायिक मंडळींचे नुकसान होते. त्यात पुन्हा दुसरे नाट्यगृह उपलब्ध नसल्याने या मंडळींना थिएटरची टंचाई विशेष तीव्रतेने जाणवते. स्पर्धेत भाग घेणाऱ्या संस्थांचा अनुभव फारसा चांगला नाही. स्वच्छतेबाबत योग्य ती काळजी घेतली जात नाही.

जाधव – सबनीस यांचा हा युक्तिवाद समाज कल्याण खात्याला आणि त्यातही पुण्यातील स्पर्धक संघांना मुळीच मान्य नाही.

दुपारचे खेळ सामान्यपणे शनिवार – रविवार – सोमवार आणि सार्वजनिक सुटीच्या दिवशी असतात. हे दिवस टाळून तारखा देणे शक्य असते. आणि त्याप्रमाण तारखा गेल्या वर्षी देण्यातही आल्या होत्या. म्हणजेच या मंडळींच्या मते दुपारचे खेळ बुडाल्यामुळे होणारे आर्थिक नुकसान टाळणे शक्य आहे. व्यावसायिक, आणि हौशी नटसंघ यांच्यामधील बळकट दुवा म्हणजे या स्पर्धा. या स्पर्धांना बालगंधर्व रंगमंदिर दिल्याने नाट्यव्यवसायाचे नुकसान होते हा युक्तिवादही टिकण्यासारखा नाही. स्पर्धेच्या रंगभूमीवर यशस्वी ठरुन नाट्य व्यवसायात शिरलेली व तितक्याच

प्रमाणात यशस्वी झालेली किती उदाहरणे सांगावीत ! दत्ता भट, गणेश सोळंखी, सखाराम भावे, सतीश दुभाषी, डॉ. लागू, मधूकर तोरडमल, श्रीकांत मोघे, विजया खोटे, ही नट मंडळी पुरुषोत्तम दारव्हेकर, शाम फडके, वसंत कानेटकर, ही लेखक दिग्दर्शक मंडळी, आणि संभुसाच्या चाळीत, काळे बेट, वऱ्हाडी मानसं, कथा कुणाची – व्यथा कुणा, काका किशाचा, आदि यशस्वी नाटके – या सर्वांचे श्रेय स्पर्धेला द्यावे लागेल· व्यावसायिक रंगभूमीचे तंत्र सुधारले आहे. अभिनयाच्या पद्धतीत बदल होत आहे. हौशी रंगभूमीवरील चांगल्याचे अनुकरण होत आहे. थोडक्यात म्हणजे व्यावसायीक रंगभूमीला उपकारक ठरणाऱ्या या स्पर्धा त्यांना रंगमंदिर नाकारणे आणि ते नाकारताना व्यावसायिक रंगभूमीचे नुकसान होईल असा आव आणणे, हे शुद्ध ढोंगीपणाचे आहे.

आता परिस्थिती अशी आहे की, स्पर्धांना सोयीस्कर असलेल्या तारखा देऊन झाल्या आहेत. भरत नाट्य मंदिर उपलब्ध नाही आणि महाराष्ट्र व्यायाम मंडळाच्या व्यायामशाळा – कम सभागृह कम नाट्यगृहामध्ये स्पर्धा भरविण्यास संयोजक आणि स्पर्धक दोघेही फारसे उत्सुक नाहीत. यावर उपाय म्हणून स्पर्धा पुण्या· बाहेर बहुधा नगरला भरवण्याचे घाटत आहे. आणि रंगमंदिर मिळत नसल्यामुळे जर स्पर्धा बाहेर होणार असतील तर त्यात आपण भाग घेणार नसल्याचे राजा नातू, मधू लोखंडे, राजाभाऊ थिटे, वसंत लोणकर, बाबूराव विजापुरे आदि मंडळींनी माझ्याजवळ बोलून दाखवले.

प्रकरण मिटते कसे हे आज सांगणे कठीण असले तरी संस्थांची एकजूट टिकल्यास अनेक महत्त्वाचे प्रश्न धसास लागणार आहेत.

पुणे केंद्रातील स्पर्धेमध्ये भाग घेणाऱ्या बहुसंख्य संस्था पुण्यातील. गेली वर्षानुवर्षे या संस्था नाट्य-



क्षेत्रात महत्त्वपूर्ण कामगिरी बजावत आहेत. आणि त्यांना स्पर्धेच्या वेळी महानगरपालिकेचे रंगमंदिर नाकारणे, हा संपूर्ण असमर्थनीय निर्णय असून त्याचा कठोरपणे धिक्कार केला गेला पाहिजे. महानगरपालिकेने रंगमंदिर बांधले ते केवळ धंदा करण्यासाठी नाही. रंगमंदिराच्या उद्‌घाटन समारंभप्रसंगी 'रंगमंदिराचा पुण्यातील कलाकारांनी जास्तीत जास्त उपयोग करून घ्यावा, आणि रंगमंदिर केवळ नाटच मंदिर न रहाता महत्त्वपूर्ण सांस्कृतिक केंद्र बनावे." अशी अपेक्षा महापौरांनी व्यक्त केली होती. त्याची आठवण स्पर्धेला रंगमंदिर नाकारणाऱ्या मंडळींना करून द्यावीशी वाटते. या मंडळींना केवळ धंदाच करायचा असेल तर भाडे ठरवण्याऐवजी खुशाल टेंडर्स मागवावीत आणि जास्तीत जास्त भाडे देणाऱ्यांना रंगमंदिर द्यावे. परंतु रंगमंदिराच्या मूळ उद्दिष्टांना बगल देऊन स्पर्धांना रंगमंदिर नाकारणे योग्य ठरणार नाही. त्यातही नाटचगृह हा किफायतशीर व्यवसाय नाही. उभ्या महाराष्ट्रात खाजगी क्षेत्रामध्ये एकही नाटचगृह नाही हे ह्याचेच द्योतक नाही का ?

रंगमंदिराची तारखा देण्याची पद्धत ही दोषास्पद समजली पाहिजे. आज जाधव-सबनीस जोडीच्या ताब्यात तारखांची किल्ली आहे. पुढील ९० दिवसांसाठी ठरलेल्या मुदतीत समजा १५० अर्ज आले, तर त्यातील कोणत्या मंडळींना रंगमंदिर द्यायचे, हे ही जोडी ठरवते. ठराविक मुदतीपूर्वी अर्ज करण्याचा नियम सोडल्यास तारखा देण्याबाबत अन्य कोणतेही नियम लागू नाहीत. सर्वसाधारण परिस्थितीत एका व्यक्तीस किंवा संस्थेस सलग तारखा देण्याने इतर अनेकांवर अन्याय होत असतो. असे असूनही श्री. पु. ल. देशपांडे यांना ऑक्टोबरमध्ये अकरा तारखा व केवळ एक दिवसाचा खंड ठेऊन देण्यात आल्या आहेत, असे समजते. स्पर्धेला रंगमंदिर नाकारणाऱ्यांना पु. लं. ची साग्रसंगीत सोय कशी करता येत हे समजू शकत नाही.

रंगमंदिराचे भाडे तसे कमी नाही. पण हे भाडे भरूनही कलावंत मंडळींना बाहेरून आणलेले खाद्यपदार्थ तेथे खाऊ देण्यात येत नाहीत, हेही अन्यायकारक आहे.

पुण्यातील नाटयसंस्थांना महानगरपालिकेचे रंगमंदिर मिळविण्यासाठी संघर्ष करण्याची पाळी यावी ही दुर्दैवी बाब असली तरी या संस्थांनी व समाज कल्याण खात्याने एकजुटीने काम करून या अन्यायाचे निराकरण शक्यतो याच वर्षी आणि कोणत्याही परिस्थितीत पुढील वर्षी करवून घेतलेच पाहिजे. महानगरपालिकेत नागरिकांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या नगरपित्यांनी कर्तव्यबुद्धीने हा प्रश्न धसास लावावा असे सुचवावेसे वाटते.

□ □ □

# आळशाचे भाग्य

अनंत भावे

फार फार वर्षांपूर्वी एका देशात एक राजा राज्य करीत होता. राजा मोठा सामर्थ्यशाली होता. या राजाच्या दरबारात अनेक विद्वान् आणि कलावंत मंडळी होती. त्यातील एकजण एकदा असे म्हणाला की माणसाने आपल्या डोळ्यांसमोर कसलेतरी ध्येय ठेवले पाहिजे. ध्येय फार मोठेच पाहिजे असे नाही. किंबहुना अगदी क्षुल्लक ध्येय असायला मुळीच हरकत नाही; त्यामुळेदेखील मनुष्याचे कल्याणच होते ! त्याचे म्हणणे इतर विद्वानांना पटले नाही. त्यांच्या मतें मनुष्याची भरभराट होण्यासाठी त्याच्यापुढील ध्येयही भव्य, दिव्य, उदात्त, महान पाहिजे. त्या विद्वानांना आपले म्हणणे पटावे म्हणून उदाहरणादाखल त्याने पुढील गोष्ट सांगितली; आणि गोष्ट ऐकल्यानंतर मात्र साऱ्या विद्वानांनी त्याचे म्हणणे एकमुखाने मान्य केले.

ती गोष्ट अशी :

एका गावात एक ब्राह्मण राहात असे. तो फार फार आळशी होता. काहीही काम न करता नुसते बसून राहणे त्याला फार आवडत असे. बालपणी वडिलांनी आणि तरुणपणी सासऱ्याने त्याची देखभाल केली. पण ती म्हातारी माणसे कोठवर पुरणार? यथाकाल ती मृत्यु पावली. आता ब्राह्मणाने आपला भार बायकोवर टाकला आणि आपले आळशाचे व्रत पुढे चालवले. बायकोला त्याचे वागणे अगदी आवडत नसे; पण बोलूनचालून ती बायकोच. ती बिचारी काय करणार. पण अखेर तिचा देखील नाइलाज झाला.

एके दिवशी सकाळी ती त्याला म्हणाली, " आणखी थोड्या दिवसांनी आपण पुरते कफल्लक होणार. दागिनेदेखील संपले सारे माझ्याजवळचे.

सगळी माणसं काही ना काही ध्येय डोळचांसमोर ठेऊन राहतात. पण तुमचं पाहावं ते विलक्षणच: ओंडक्यासारखं दिवसरात्र नुसतं पडून राहायचं. ते काही नाही. मी हे अखेरचं सांगते आहे तुम्हाला : तुम्ही डोळचासमोर एखादं ध्येय ठेवल्याशिवाय मी मुळी तुम्हाला जेवायलाच घालणार नाही."

ब्राह्मण विचारात पडला. मोठीच पंचाईत झाली होती. जेवल्याशिवाय आळशीपणातली गंमत नाहीशी होते, असा त्याचा अनुभव होता. आणि इथे तर बायको त्याचे जेवण तोडायला निघाली होती. शेवटी डोके लढवून त्याने एक युक्ती काढली. तो बायकोला म्हणाला, "माणसानं आयुष्यात काहीतरी ध्येय डोळचासमोर ठेवलं पाहिजे हे तुझं म्हणणं मला अगदी संपूर्णपणं पटलेलं आहे. मीही स्वतःसमोर आता एक ध्येय ठेवणार आहे. मग तर होईल तुझं समाधान?"

ब्राह्मणाचे बोलणे ऐकून ब्राह्मणपत्नीला अत्यंत आनंद झाला. पण ब्राह्मणाने स्वतःसमोर ठेवलेले ध्येय तिला सांगितले आणि तिच्या आनंदावर विरजण पडले. ब्राह्मण म्हणाला, "माझ्यापुढं मी असं ध्येय ठेवणार आहे की मी दररोज आपल्या शेजारच्या कुंभाराचं तोंड पाहिल्याशिवाय जेवणार नाही!"

ब्राह्मणपत्नी नाराज झाली असली तरी म्हणाली, "काही हरकत नाही. अगदीच काही ध्येय नसण्यापेक्षा हे बरं."


## पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नांनंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यात यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणांस त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतलेला आहे, अजूनही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

वेस्टर्न इंडिया कं. (बी. एन.) पो. कतरीसराय (गया)

ब्राह्मणाची दैनंदिन ध्येयसिद्धी सहज होत असे. त्यामुळे त्याच आळशीपणा व्यवस्थित पोसला जात होता.

परंतु एके दिवशी मात्र ब्राह्मण उठण्यापूर्वीच कुंभार रानात माती आणायला निघून गेला होता. त्यानंतर बराच वेळ गेला; पण कुंभार परतण्याचे चिन्ह दिसेना. कुंभाराचे दर्शन झाल्याशिवाय ब्राह्मणाला जेवता येणार नव्हते. आता काय करणार? त्याने आणखी थोडा वेळ वाट पाहिली. शेवटी पोटातील भूक अनावर झाली तेव्हा रानात जाऊन कुंभाराचे दर्शन घ्यावे आणि परत येऊन झकास जेवावे, असा विचार करून ब्राह्मणाने रानाची वाट धरली.

कुंभार रानात माती जमवीत होता. माती खणता खणता त्याची कुदळ अचानक एका पितळी हंड्यावर बसली. आवाज झाला. कुंभाराने भराभर भोवतालची माती काढली आणि हंडा मोकळा केला. वरचे झाकण उघडले आणि पाहतो तो हंड्याच्या गळ्यापर्यंत पिवळ्याजर्द मोहोरा भरल्या होत्या!

याच वेळी थोड्या अंतरावरून येणाऱ्या ब्राह्मणाकडे कुंभाराचे लक्ष गेले. ब्राह्मणाची आणि त्याची नजरानजर होताच ब्राह्मण मागे फिरला आणि भुकेमुळे झपाझप घराकडे चालू लागला.

इकडे कुंभाराला वाटले आपल्याला मिळालेला मोहोरांचा हंडा या ब्राह्मणाने पाहिला आहे, आणि त्याविषयी कोतवालाकडे वर्दी देण्यासाठी हा घाईघाईने निघाला आह. तसे झाले तर सगळ्याच मोहोरा हातून जाणार होत्या. त्यापेक्षा या ब्राह्मणाला अर्धा वाटा द्यावा म्हणजे निदान अर्ध्या मोहोरा तरी आपल्या पदरात पडतील.

एका क्षणात हा सगळा विचार पक्का होऊन कुंभाराने ब्राह्मणाला हाक मारली, "अहो महाशय. इकडं या. मागं फिरा."

ब्राह्मणाला वाटले मागे फिरून जेवायला उशीर कशाला करा. तो उत्तरला, "नको नको. मी पाहिलंय तुला. आता जातो तडक."

कुंभार अधिकच घाबरला. तो पुन्हा पुन्हा हाका मारून ब्राह्मणाला मागे बोलावू लागला. सरतेशेवटी ब्राह्मणाने मागे फिरण्याचे ठरवले. ब्राह्मण परत आला आणि त्याला तो मोहोरांचा हंडा दिसला. ब्राह्मणाने काही बोलण्याच्या आधीच कुंभाराने त्याची गयावया करायला सुरुवात

केली, " महाशय, हवं तर या मोहोरातल्या अर्ध्या मोहोरा तुम्ही घ्या. पण, कोतवालकडं जाऊ नका."

कुंभाराचा झालेला घोटाळा ब्राह्मणाच्या लागलीच ध्यानात आला आणि त्याने काही काळ कोतवालाकडे जाण्याची बतावणी करून शेवटी कुंभाराचे म्हणणे मान्य केले !

येणेप्रमाणे अति क्षुल्लक ध्येय डोळचांसमोर ठेवणाऱ्या त्या आळशी ब्राह्मणालादेखील अंती धनलाभ होऊन तो सुखी झाला. □ □ □


## इंदू साक्रीकर साहित्य पारितोषिक योजना

कै. इन्दु साक्रीकरांच्या समाजिक जीवनातील कार्याविषयी आणि एकूण साहित्य-निष्ठेविषयी आदर व्यक्त करावा, त्या क्षेत्रातील त्यांच्या कार्य–कर्तृत्वाचे सतत स्मरण रहावे एतदर्थ 'इंदु साक्रीकर स्मारक योजना' आखण्यात आली असून मराठीत साहित्य निर्मिती करणाऱ्या स्त्री लेखिकांसाठी एक कथा स्पर्धा प्रतीवर्षी अयोजित करून त्यात उत्कृष्ट ठरणाऱ्या पहिल्या तीन कथात एकूण पाचशे रुपयांची रोख पारितोषिके २६ ऑक्टोबर रोजी येणाऱ्या इंदु साक्रीकरांच्या स्मृतिदिनी देणे हा ह्या योजनेचा एक महत्त्वपूर्ण भाग आहे.

कथा लेखिकेने कथा स्पर्धेसाठी किती कथा पाठवाव्यात ह्यावर तसेच विषया-वर कोणतेही बंधन नाही, परंतु प्रत्येक कथेच्या तीन सुवाच्य प्रती पाठवाव्यात.

कथा स्पर्धेसाठी पाठविलेली कथा आपली संपूर्ण स्वतंत्र निर्मिती असल्याचे व ती ह्या पूर्वी इतरत्र कुठेही प्रसिद्ध न झाल्याबद्दलचे आवेदन लेखिकेने कथेसोबत पाठ-विणे आवश्यक आहे.

परीक्षकांचा निर्णय स्पर्धकांवर सर्वस्वी बंधनकारक राहील.

कथास्पर्धेसाठी खालील प्रमाणे बक्षिसे आहेत.

क्रमांक एक : रुपये २५०·००

क्रमांक दोन : रुपये १५०·००

क्रमांक तीन : रुपये १००·००

स्पर्धेसाठी कथा पाठविण्याची अखेरची तारीख १५ आक्टोबर १९६९ ही आहे.

विशेष माहितीसाठी 'वीणा मासिका'चा सप्टेंबर १९६९ चा अंक कृपया पहावा.

स्पर्धेत भाग घेणाऱ्या कथा-लेखिकांनी आपल्या कथा खालील पत्त्यावर पाठवाव्यात.

इंदु साक्रीकर स्मारक समिती, १२, रम्पार्ट रो, फोर्ट, मुंबई–१ (बी. आर.)

## ऑपरेशन दिंडोशी.... [ पृष्ठ ११ वरून ]

नारायण, अच्युतराव पटवर्धन, डॉ, लोहिया, मधु लिमये इत्यादी क्रांतिकारकांची ती एक भूमिगत छावणी होती. त्यांनी शेतीतही नवे उत्पादनाचे प्रयोग यशस्वी करून दाखविले आहेत. त्यांनी ह्या प्रयोगासाठी आपली ५ एकर जमीन दिली; विशेषत: 'अकुशल विद्यार्थ्यांकडून शेतीची नासाडी होईल. कशाला धोका पत्करता?' असा इशारा इतर अनुभवी मंडळी देत असता दिली. मागाठाणे हे बोरिवली येथे नॅशनल पार्कजवळ महात्मा गांधींच्या समाधीच्या खालच्या बाजूला एक आदिवासींचे गाव आहे. तेथील शेतकऱ्यांचा संबंध १९५८ साली आला. डॉ. राम मनोहर लोहियांच्या नेतृत्वाखाली प्रजासमाजवादी पक्षांतून बाहेर पडलेला बोरिवली तालुक्यातील काही कार्यकर्त्यांचा गट तेथे किसान संघटनेचे काम करीत होता. त्याचे नेतृत्वही आबांकडे होते. जपानी पद्धतीने त्यावेळेस त्या आदिवासींना शेती करावयास लावले होते व त्यातील एकाला—भायल्या मंगल्याला अधिक उत्पादन केल्याबद्दल कलेक्टरकडून एक लोखंडी नांगर बक्षीस मिळाला होता. त्याने स्वतःच ह्यावेळी नव्या जातीची लागवड करण्याचा आपला मनोदय जाहीर केल्यामुळे त्याच्या शेतातील काही जमीन आम्ही प्रयोगाखाती घेतली.

विद्यार्थ्यांची ही पहिलीच वेळ असल्याकारणाने शेतीतील काही निवडक कामे त्यांना करावयास दिली होती. म्हणून राबाचे काम कुशल मजुरांकडून जून महिन्यातच उरकून घेण्यात आले होते. शेतीसाठी अधिक उत्पादन देणाऱ्या भाताच्या दोन जाती—फोर्मोसा येथील टायचूंग नेटिव्ह—१ व फिलिपाईन्समधील आय्. आर् ८ घेतल्या होत्या. ह्या जातीत आणि आपल्या परंपरागत जातीत फरक असा की, ह्या नव्या जातींची उंची थिटी असून खत दिल्यास पानांची वाढ न होता फुटवे अधिक येऊन दाणे वाढतात. त्या उलट भारतीय परंपरागत जातींना खते उपयोगी पडत नाहीत. उलट ती दिल्यास पानांची उंची मात्र वाढते व रोपे कोसळतात. त्याशिवाय उत्पादनाच्या दृष्टीने महत्त्वाचा फरक म्हणजे सर्व परिस्थिती अनुकूल असता परपरागत जातीचे कमाल उत्पन्न एकरी ८०० किलोपेक्षा अधिक जात नाही आणि साधारणत: २०० ते ३०० किलो असते. त्याउलट नव्या जातीना पाणी कमी लागत असून सरासरी उत्पन्न एकरी १८०० ते २००० किलो येते.

लावणीच्या कामासाठी सहा दिवसांचा आठवडा धरून सहा शिक्षण संस्थांतील विद्यार्थ्यांना एक एक दिवसाचा लावणीचा कार्यक्रम वाटून देण्यात आला होता. हे काम जवळ जवळ महिनाभर चालल्या कारणाने प्रत्येक गटाला चार वार कामाचे मिळाले. ह्यात भाग घणारे विद्यार्थी म्हणजे मुंबईतील किर्ती कॉलेजचे ३४, रुइया कॉलेजचे २७, पोद्दार कॉमर्सचे ११, मुंबई विश्वविद्यालयाने आयोजित केलेल्या वनगाव शिबीराला गेलेल्या विद्यार्थ्यांपैकी २२, गोरेगावातील नंदादीप हायस्कूलचे ४०,

अ. भि. गोरेगावकर इंग्लीश स्कूलचे ४०, उत्क्रांतिदल नावाच्या स्थानिक विद्यार्थी संघटनेचे १० व 'युक्रांद' या युवक संघटनेचे ५ असे एकूण १८० विद्यार्थी व १० प्राध्यापक व ७ शिक्षक यांनी भाग घेतला. संवयीच्या अभावी एकूण कामाला वेळ जरी कमी होता तरी लावणीचे काम अत्यंत शिस्तीने व उत्साहाने झाले.

आमच्या या प्रयोगात एका गोष्टीची फार खबरदारी घेतली आहे. सामान्यतः आपल्या येथे जी कामे होतात त्यात एका बाजूला प्रत्यक्ष काम व दुसऱ्या बाजूला जाहीरातबाजी आणि खर्च यांचे नेहमीच व्यस्त प्रमाण होते. काम कमी व बोभाटा आणि खर्च बेसुमार अशीच परिस्थिती असते. त्यामुळे आपणा कोणालाही असल्या कामाचे मूल्यमापन करण्याची सवय होत नाही ! विद्यार्थीही 'एक चैन' म्हणून अशा कामाकडे पहावयास लागतात असा अनुभव बऱ्याच ठिकाणी येतो. म्हणून सुरुवाती-पासून प्रत्येक गोष्टीची काटाक्षाने नोंद करण्यात आली आहे. काम करायला आलेल्या विद्यार्थ्याने प्यालेल्या चहाच्या एका कपाचीही नोंद केलेली आहे; मग तो खर्च कोणीही केलेला असो. ह्या सर्व प्रयोगाचा हिशेब करताना त्याचा समावेश करावयाचा आहे. ह्या वृत्तीमुळेच गांधीजी चरखासंघ, ग्रामोद्योगसंघ अशा देशव्यापी संस्था यशस्वीपणे उभारू शकले. भारतासारख्या गरीब देशात बिनहिशेबीपणा गुन्हा समजला पाहिजे. ह्या कामात विद्यार्थ्यांतील एका चांगल्या प्रवृत्तीचे दर्शन झाले. त्यांची शिस्त, व्यवस्थितपणा याबद्दलची आवड दिसून आली त्याच बरोबर 'आपण नीट काम केले नाही तर नुकसान होईल' ह्याचीही जाणीव त्यांच्यात दिसून येत होती. येथे खोटे कौतुक केले जात नव्हते. कित्येक वेळा चूक केली असता आबा करमरकरांकडून चांगला दमही मिळत होता, पण आबांचे व मुलांचे व्यवस्थित सूत जमले आहे. लावणीचे काम पूर्ण झाले असून रोपे वर येऊ लागली आहेत व विद्यार्थ्यांत उत्सुकता निर्माण झाली आहे. आपण केलेल्या श्रमातून काय निर्माण होणार आहे ! आपल्या खटपाळ वृत्तीतून काही नुकसान तर झाले नाही ना ! अशी थोडी रुखरुखही आहे. पण एकरी २००० किलोपेक्षा कमी येणार नाही असा विश्वासही आहे. तेव्हा ते कापणीच्या हंगामाची उत्सुकतेने वाट पहात आहेत. हा प्रयोग एका नव्या युवक चळवळीची नांदी आहे. युवकांकडून प्रतिसाद तर उत्साह-वर्धक आहे. पण ह्या प्रयोगाची व्याप्ती आपण ग्रामीण विभागातील शाळा कॉलेजां-पर्यंत किती वेगाने नेतो त्यावर ह्या चळवळीचे भवितव्य अवलंबून आहे.

चौथी सचित्र आवृत्ती

# राजा शिवछत्रपति

ब. मो. पुरंदरे

मूल्य : रुपये बेचाळीस फक्त

राजहंस प्रकाशन

पुणे

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून, तिथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M H-649



"साहेब, तुम्ही त्या लोकांना संकट निवारण्यासाठी गांधीजींची शिकवण आचरणात आणा असा फिरून फिरून उपदेश करीत होतात ना, त्यावेळी मी तुम्हाला सांगायचा सारखा प्रयत्न करीत होतो की हे शिष्टमंडळ दंगलग्रस्तांचे नाही, पूरग्रस्तांचे आहे म्हणून..."